मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४९ ■ शुक्रवार, ०६ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे दुर्घटना टळली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : नवीन पनवेल सेक्टर 1 झोपडपट्टी परिसरात शगुन बँक्वेटजवळ, रेल्वे पत्रीजवळ मंगळवारी दुपारी अचानक आग लागली. दुपारी 12.55 वाजता मिळालेल्या माहितीवरून नवीन पनवेल अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आग मोठ्या प्रमाणात पसरत असल्याचे लक्षात येताच नवीन पनवेल केंद्राचे एमएच 46 जी 0057 हे वाहन प्रथम पोहोचले. परिस्थितीची तीव्रता पाहून एमचएच 46 डीसी 0323 तसेच ओल्ड पनवेल येथील एमएच 46 बीएम 0961 व एमएच 02 जीएच 4897 ही अतिरिक्त वाहने मदतीसाठी



बोलावण्यात आली. जवानांनी पाच होजची एक लाईन व डायव्हिंग ब्रिचिंगच्या सहाय्याने दोन लाईन टाकत आगीवर नियंत्रण मिळवले.

दरम्यान, घटनास्थळी दोन गॅस सिलेंडरचा स्फोट झाला; मात्र सहा सिलिंडर सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग पूर्णपणे विझवण्यात आली.

या आगीत पाच घरे जळून खाक झाली असून, घरगुती साहित्य व पत्र्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच शेजारील शगुन बँक्वेट हॉलच्या छताचे व काही साहित्याचे किरकोळ नुकसान झाले. उपअग्निशमन अधिकारी अतुल सपकाळ व शुभम राठोड यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली. आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, तपास सुरू आहे.

## गृहनिर्माणासह पायाभूत विकासात कॅनडाचे सहकार्य राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी कॅनडा उत्सुक आहे.कॅनडियन इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या सहभागातून गृहनिर्माण व पायाभूत क्षेत्रातील दोन महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीद्वारे या सहकार्याची सुरुवात केली जाईल. कॅनडाच्या वित्तीय व तांत्रिक सहकार्यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत विकासाला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सेबास्टियन यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. यावेळी वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख आर्थिक व गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अभिनेता अजिंक्य देव आणि अतुल गुप्ता उपस्थित होते.



कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या गुंतवणुकीसंदर्भात आठ प्रमुख मुद्द्यांवर आधारित सविस्तर सादरीकरण यावेळी करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात विविध पायाभूत विकास प्रकल्प सुरू आहेत. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा लाभ घेण्यात येणार आहे. म्हाडा तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) महत्त्वाच्या उपक्रमांसाठी हे सहकार्य उपयुक्त ठरेल. प्राथमिक टप्प्यात दोन प्रकल्पांची निवड करून भागीदारीच्या दृष्टीने चर्चा केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी डॉ. सेबास्टियन यांनी महाराष्ट्रातील पायाभूत विकासासाठी कॅनडाच्या वित्तपुरवठा साखळीच्या माध्यमातून विविध तांत्रिक व आर्थिक उपाययोजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येईल, तसेच आवश्यकतेनुसार जी-20 ऑफटेकसह उच्च दर्जाची 'ट्रिपल-ए' रेटेड विश्वासार्हता प्रदान करण्यात येईल, अशी वचनबद्धता व्यक्त केली.

## पत्रकारिता आणि समाजसेवेचा गौरव!

### दैनिक युवक आधारचे सहसंपादक आदरणीय मुकुंद कांबळे यांना 'महात्मा गांधी राष्ट्रीय सेवा पुरस्कार २०२६'

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्स्ना करवाडे/विदर्भ संपादिका** : निःस्वार्थ सेवाभाव, अखंड राष्ट्रप्रेम आणि समाजासाठी झटण्याची धग या त्रिसूत्रीवर आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणारे सामाजिक कार्यकर्ते तथा दैनिक युवक आधारचे सहसंपादक मुकुंद शंकर कांबळे यांना 'महात्मा गांधी राष्ट्रीय सेवा पुरस्कार २०२६' ने सन्मानित करण्यात आले आहे. हा सन्मान म्हणजे त्यांच्या अथक परिश्रमांचा, प्रामाणिक झपाट्याचा आणि समाजाविषयीच्या अपार प्रेमाचा देशपातळीवर झालेला गौरव आहे.

मुकुंद कांबळे यांनी गेल्या अनेक वर्षांत समाजातील शेवटच्या माणसापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा ध्यास घेतला. गरीब, गरजू, निराधार, युवक, महिला आणि वंचित घटकांसाठी त्यांनी राबवलेले उपक्रम हे केवळ योजना नव्हेत, तर असंख्य कुटुंबांच्या जीवनात उजेड घेऊन येणारी आशेची पहाट ठरली आहेत. आरोग्य शिबिरे असोत की जनजागृती मोहिमा – त्यांच्या प्रत्येक कृतीत



माणुसकीचा स्पर्श जाणवतो.

पत्रकारितेच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि त्याच वेळी प्रत्यक्ष कृतीतून पीडितांसाठी उभे राहणे, ही त्यांची ओळख बनली आहे. लेखणी आणि कृती यांचा सुंदर संगम साधत त्यांनी समाजमनाला जागं केलं. म्हणूनच हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून, समाजासाठी झटणाऱ्या प्रत्येक संवेदनशील मनाचा विजय आहे.

पुरस्कार स्वीकारताना त्यांनी हा सन्मान समाजाने दिलेल्या विश्वासाचा असल्याचे सांगितले. डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू आणि मनात नव्या उमेदीची ज्योत घेऊन त्यांनी पुढील काळातही अधिक ताकदीने राष्ट्रसेवेचा मार्ग चालण्याचा निर्धार व्यक्त केला.आज त्यांच्या या यशाकडे पाहताना असंख्य युवकांच्या मनात एकच भावना दाटून येते — "आपणही समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे!" हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

**दैनिक युवक आधार परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन!**

दैनिक युवक आधारचे सहसंपादक मुकुंद शंकर कांबळे यांनी पत्रकारिता आणि समाजसेवा या दोन्ही क्षेत्रांतून समाजासाठी जे दीपस्तंभासारखे कार्य केले आहे, त्याचा हा राष्ट्रीय सन्मान आम्हा सर्वांसाठी अभिमान, आनंद आणि प्रेरणेचा क्षण आहे. त्यांच्या पुढील सामाजिक व राष्ट्रसेवी वाटचालीस दैनिक युवक आधार परिवार मनापासून शुभेच्छा देत आहे.

## अप्रचारावर विश्वास ठेऊ नका – आत्माराम भस्मा यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** अविनाश केसरीनाथ कोळी यांच्याकडून मी केलेल्या कामाचे पैसे येणे बाकी आहे, मात्र उलट माझ्यावर फसवणूक केल्याचा कांगावा कोळी यांनी केला असून हा प्रकार राजकीय वैमनस्यापोटी घडवून आणला आहे, विशेष म्हणजे मी केलेल्या कामाचे सव्वा सात लाख रुपये त्यांच्याकडून येणे बाकी आहे, असा खुलासा करत नेरे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार आत्माराम बाळू भस्मा यांनी कोळी यांचे आरोप मोडीत काढले.

या संदर्भात बोलताना आत्माराम भस्मा यांनी सांगितले कि, दिवाळे येथील अविनाश केसरीनाथ कोळी यांची जमिनीच्या व्यवहारातून ओळख झाली. त्यांना धामणीमधील हवशाची वाडी येथील जमीन खरेदीसाठी दाखवण्यात आली. ते आणि शेतकरी यांच्यात व्यवहार होता. त्यावेळी मला याचा कोणताही मोबदला न देता त्याऐवजी त्या जागेला संरक्षक भिंतीचे काम देण्याचे कोळी यांनी मान्य केले आणि ते काम मी पूर्णही करून दिले आहे, हे काम साडे आठ लाख रुपयांचे होते त्यापैकी मला अवघे १ लाख २५ हजार रुपये त्यांनी दिले. त्यामुळे मी माझे पैसे अनेकदा त्यांच्याकडे मागितले मात्र त्यांनी आज उद्या करत अद्यापपर्यंत माझ्या मेहनतीचे पैसे दिले नाहीत. मी पैशासाठी तगादा लावतोय असे समजताच पैसे द्यायला नको यासाठी त्यांनी वेगळा मार्ग काढत त्यात मला गोवण्याचा प्रकार कटाने केला. आणि त्याची कल्पना मला नंतर आली. चांगला परिचय असल्याने त्यांनी त्यांच्या मुलीच्या शिक्षणासाठी पुण्याला जायचे सांगून माझी गाडी दोन दिवसांकरिता घेतली होती. सदरच्या गाडीत माझे कागदपत्रे असतात आणि त्यामध्ये चेकबुक सुद्धा होते.



आणि त्या चेकबुकमधील एका चेकवर माझी सही होती. आणि तो चेकबुक त्यांच्या हाताला लागल्यावर त्या चेकवर कोळी यांनी स्वतःच्या अक्षरात ३० लाख रुपये रक्कम लिहून सदरचा चेक स्वतःच्या खात्यात टाकून मुद्दामहून तीनवेळा बाउंस केला. सदरचा चेक बाउंस झाल्याचे मला कळल्याने मला मोठा झटका मिळाला, ज्या व्यक्तीकडून मला पैसे येणे बाकी होते त्यानेच मला फसविले. व्यवहारात माझी मोठी फसवणूक झाली मात्र आपला स्वभाव एखाद्याचे वाईट करणे नाही त्यामुळे नशिबावर सोडत हा विषय जास्त मनावर घेतला नाही. पैसे आज नाही तर उद्या भेटतील असा विश्वास ठेवला. माझे पैसे न देता माझ्यावरच फसवणूकीचा केलेला आरोप हास्यास्पद असून भाजप महायुतीचा मी उमेदवार असल्याने या निवडणुकीच्या तोंडावर विरोधांकडून करण्यात आलेला कटकारस्थान आहे. सदरच्या विषयात विरोधकांडून अप्रचार केला जात असून हा प्रकार केवळ आर्थिक फसवणुकीपुरता मर्यादित नसून आदिवासी समाजातील व्यक्तीचा अपमान करणारा आहे. झालेल्या फसवणुकीबाबत आपण कायदेशीर लढाई देणार आहे, असेही आत्माराम भस्मा यांनी नमूद केले आहे. तसेच समस्त मतदार बंधू भगिनींनी विरोधकांनी केलेल्या कटकारस्थानाला आणि भूलथापांना बळी पडू नये असे आवाहनही शेवटी बोलताना आत्माराम बाळू भस्मा यांनी केले आहे.






# ३२ वर्षांची शिस्तबद्ध सेवा, निवृत्तीनंतरही समाजासाठी निरंतर योगदान

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे** : मुख्याध्यापक अशोकराव नगरकर यांनी आपल्या ३२ वर्षांच्या सेवाकाळात शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सामाजिक जाणीव यांना प्राधान्य दिले. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न प्रेरणादायी आहेत. निवृत्तीनंतरही समाजासाठी त्यांचा अनुभव, मार्गदर्शन आणि योगदान निरंतर सुरू राहील असे मनोगत भाषणात लेखक कवी अशोकराव टाव्हरे यांनी सांगितले.




राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोकराव नगरकर यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न झाला.जुन्नर येथील आदिवासी शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी देवराम मुंढे, सामाजिक कार्यकर्ते, कवी-लेखक अशोकराव टाव्हरे, निवृत्त शिक्षणाधिकारी अशोकराव कडलग, आदिवासी शिक्षण संस्थेचे संचालक रावते, रिपब्लिकन ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संतोष नाना डोळस, मा.पंचायत समिती सदस्य कल्याणशील देखणे, खेड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर,सचिव रामदास पवार, भाजपचे खेड ता.उपाध्यक्ष दिलीपराव माशेरे,उद्योजक प्रशांत म्हसुडगे, अनिल दौंडकर, गणेश माशेरे, निवृत्त बँक अधिकारी भगवान खरपुडे, मुख्याध्यापक रामदास रेटवडे, निवृत्त मुख्याध्यापक मनोज वाघमारे, सुरेश क्षीरसागर, हुतात्मा राजगुरु विद्यालयातील शिक्षक तसेच तालुक्यातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. देवराम मुंढे यांनी आदिवासी शिक्षण संस्था जुन्नर या संस्थेच्या विविध विद्यालयात अशोकराव नगरकर यांनी केलेली कामगिरी अभिमानास्पद असल्याचे नमुद केले. प्राध्यापक मुरलीधर मांजरे यांनी सूत्रसंचालन केले.

# बँकांना जिल्हाधिकाऱ्यांचा थेट इशारा – प्रलंबित कर्जप्रकरणे तात्काळ निकाली काढा, १००% उद्दिष्ट गाठा!

## शासन योजनांच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही – जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी), प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी) आणि प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई) या शासन पूरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना बँकांनी एकही प्रकरण प्रलंबित ठेवू नये, असे स्पष्ट व कडक निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

त्यांच्या अध्यक्षतेखाली शासन पूरस्कृत योजनांचा जिल्हास्तरीय आढावा घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते.जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की,



सुशिक्षित बेरोजगार युवक, महिला, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक आणि नवउद्योजकांना स्वयंरोजगाराच्या संधी देण्यासाठी या योजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. उत्पादन, सेवा व कृषीपूरक क्षेत्रात सूक्ष्म व लघुउद्योग उभे राहावेत, हाच शासनाचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे लाभार्थ्यांकडे सहानुभूतीने पाहून प्रकरणे जलदगतीने मार्गी लावावीत.

बैठकीस अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पुनम घूले, कृषी उपसंचालक हिना शेख तसेच विविध राष्ट्रीयीकृत, खासगी व सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी बँकनिहाय उद्दिष्टे, प्राप्त प्रस्ताव, मंजूर प्रकरणे, मंजुरीची टक्केवारी व प्रलंबित अर्जांचा सविस्तर आढावा घेतला आणि कमी कामगिरी करणाऱ्या बँकांना गती वाढवण्याचे आदेश दिले.

१)सीएमईजीपी अंतर्गत आतापर्यंत ३४९ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली आहे.२) पीएमईजीपी अंतर्गत २१ पैकी २१ उद्दिष्टे पूर्ण झाली असून योजना यशस्वी ठरली आहे.

३)पीएमएफएमई अंतर्गत प्राप्त २८७ पैकी १०८ प्रकरणांना मंजुरी, उर्वरितांवर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.सीएमईजीपी अंतर्गत अर्ज सादर करण्यापासून मंजुरीपर्यंतची प्रक्रिया पूर्णतः निशुल्क असून लाभार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

"शासन पूरस्कृत योजना युवकांना आत्मनिर्भर बनविण्याचे प्रभावी माध्यम आहे. वेळेत कर्ज मंजुरी व वितरण झाल्यास प्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होईल. त्यामुळे एकही प्रस्ताव प्रलंबित राहता कामा नये," असा ठाम इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.मार्च एंड लक्षात घेता, सर्व बँकांनी प्रलंबित कर्जप्रकरणे विहीत मुदतीत निकाली काढून १०० टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य करावी, असे स्पष्ट आदेशही देण्यात आले.या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे वाशिम जिल्ह्यात उद्योगसंस्कृती बळकट होऊन मोठ्या प्रमाणात स्थानिक रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी व्यक्त केला.

# रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निर्वाचन क्षेत्रामध्ये मद्य विक्री बंद

**दैनिक युवक आधार**
**नितीन लोखंडे/रायगड** : निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी, संपूर्ण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी 6 फेब्रुवारी (मतदानाच्या आधीचा दिवस), 7 फेब्रुवारी (मतदानाचा दिवस) आणि 9 फेब्रुवारी 2026 रोजी (मतमोजणीचा दिवस) या तीन दिवशी रायगड जिल्ह्यात निवडणूक होणाऱ्या संबंधित जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समिती निर्वाचन क्षेत्रातील तसेच ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, त्या ठिकाणच्या कार्यक्षेत्रातील सर्व ठोक तसेच किरकोळ मद्य व माडी विक्री अनुज्ञप्ती मद्य विक्रीस बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. 6 व 7 फेब्रुवारी



रोजी संपूर्ण दिवस व 9 फेब्रुवारी रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर होईपर्यंत सदर विक्री बंद ठेवण्यात येणार आहे.

रायगड जिल्हा परिषद 59 व 118 पंचायत समिती गणांच्या निवडणूकीकरीता 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान व 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच संपूर्ण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी जिल्हाधिकारी किशोर जावळे यांनी मुंबई मद्य निषेध अधिनियम, 1949 चे कलम 142 (1) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त आदेशान्वये, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1915 जिल्ह्यात च्या कलम 135 (सी) मधील तरतुदीनुसार रायगड जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या निर्वाचन क्षेत्रातील तसेच ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे त्या ठिकाणच्या कार्यक्षेत्रातील सर्व ठोक तसेच किरकोळ मद्य विक्री व माडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-1, एफएल-2, एफएल-३. एफएल- 4 ( क्लब अनुज्ञप्ती), एफएल/ बीआर-2, सीएल-2, सीएल-3, सीएल / एफएल/टिओडी-3, टिडी-1 इ.) 6 फेब्रुवारी 2026 रोजी (मतदानाच्या आधीचा दिवस), 7 फेब्रुवारी 2026 रोजी (मतदानाचा दिवस) या दिवशी संपूर्ण दिवस व 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर होईपर्यंत रायगड जिल्ह्यात निवडणूक होणाऱ्या संबंधित जिल्हा परिषद/ पंचायत समिती निर्वाचन क्षेत्रातील सर्व ठोक तसेच किरकोळ मद्य व माडी विक्री अनुज्ञप्ती मद्य विक्रीस बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी श्री. किशोर जावळे यांनी दिले आहेत.या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावयाची असून त्यात कसूर झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा, 1949 कलम 54 व 56 मधील तरतुदीनुसार अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# ABACUS च्या राज्यास्तरीय स्पर्धेत I win ABACUS मादळमोहीचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी गेवराई (भीमराव गावडे)** : I Win ABACUS ची राज्यस्तरीय स्पर्धा लातूर या ठिकाणी पार पडली. ABACUS हा एक ५ ते १६ वयोगटातील मुलांचा Brain development program म्हणजे मुळांचा मेंदुचा विकास करणारा program आहे.

सदर स्पर्धेत राज्यातून नामांकीत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत मादळमोही येथील सौ प्रियंका बाबासाहेब मेरडचा संचालक असलेल्या I win Abacus class ने देखील सहभाग घेतला होता या स्पर्धेत त्यांच्या कलासच्या २४ विष्याथ्यानी सहभाग घेतला होता .

त्यानं या स्पर्धेत घवघवीत यश देखील मिळाले. ही स्पधी दोन गटात घेतली गेली त्यांच्या क्लासच्या खालील विद्यार्थ्यांनी यश मिळवले

मोठा गट:सार्थक शिवाची इंगोले (राज्यातून प्रथम),कु.वेदांत शिवाजी काचोले (राज्यातुन



द्वितीय) लहान गट:कु. गौरी शिवाजी काचोळे (राज्यातुन द्वितीय)कु. पवन गणेश अडाणे (राज्यातुन तृतीय)उत्कृष्ट फ्रॅंचाईजी चा पुरस्कार I WIN ABACUS मादळमोही ब्रांच ला मिळाला त्यांना सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी चे अभिनंदन करण्यात येत आहे व पालकांच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले.तसेच भविष्यात अशा स्पर्धेत आपल्या क्लासच्या विद्यार्थ्यांना सहभागी करण्यात यावे यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# सणसर ग्रामस्थ एकवटले; राष्ट्रवादीच्या जिल्हा परिषद उमेदवार सौ माधुरी भिसे यांना मोठे मताधिक्य देण्याचा निर्धार

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय** : सणसर लासुर्णे गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा परिषद उमेदवार सौ माधुरी सागर भिसे व सणसर पंचायत समिती गणाचे उमेदवार कु. ज्योस्त्ना मोहन सुरडकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून निवडणुकीच्या प्रचारासाठी सणसर गावातील नेते आणि ग्रामस्थ एकवटले असल्याचे चित्र पाहायला मिळाले



यावेळी सणसर गावातील होम टू होम प्रचार करण्यात आला तसेच जामा मशीद सणसर येथे नमाज पठण झाल्यानंतर मुस्लिम बांधवाची भेट घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मुस्लिम समाजाबद्दल विकासाची असणारी तळमळ मुस्लिम बांधवाना समजून सांगण्यात आली.घड्याळाला जास्त मतदान करण्यासाठी विनंती करण्यात आली यावेळी सणसर गावातील ग्रामस्थ व वाडयावस्तीवरील बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

उपस्थित सर्व मुस्लिम बांधवानी एकमुखाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांना पाठिंबा दिला असून सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार केला आहे.

# आयुष क्षेत्रात नवचैतन्य - डॉ.रमेश वानखडे यांची AIMA वाशीम जिल्हा उपाध्यक्षपदी निवड!; जनरल चिकित्सक | ॲक्युपंचर व नॅचरोपॅथी तज्ञ

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : AIMA (आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन) मार्फत वाशिम जिल्ह्यात आयुष क्षेत्र अधिक संघटित व सक्षम करण्यासाठी करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण नियुक्त्यांमध्ये सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमात सक्रिय असलेले Hr. रमेश गोविंदा वानखडे यांची AIMA वाशिम जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

ही नियुक्ती AIMA चे व्हॉईस चेअरमन माननीय डॉ. नितीनराजे




> "AIMA ने माझ्यावर दाखवलेला विश्वास माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. संघटनेच्या ध्येय–धोरणांनुसार प्रामाणिकपणे काम करत वाशिम जिल्ह्यातील आयुष क्षेत्र अधिक सक्षम व लोकाभिमुख करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करीन."
>
> — डॉ. रमेश वानखडे
> जिल्हा उपाध्यक्ष, AIMA वाशिम

पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशानुसार करण्यात आली आहे. संघटनेच्या विस्तारासाठी व जिल्ह्यात आयुष पद्धतींचा प्रभाव वाढवण्यासाठी ही निवड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.डॉ.रमेश वानखडे हे सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य, शिक्षण व जनजागृतीच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. आयुष पद्धतींच्या प्रचार–प्रसारासाठी ते विविध उपक्रम राबवत असून ग्रामीण भागात आरोग्यसेवेचा विस्तार व्हावा, यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

त्यांच्या अनुभवामुळे AIMA च्या जिल्हास्तरीय कार्याला नवी दिशा मिळेल व संघटना अधिक लोकाभिमुख बनेल,

असा विश्वास संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.या निवडीमुळे वाशिम जिल्ह्यात आयुष वैद्यकीय क्षेत्र अधिक संघटित, सक्षम व परिणामकारक करण्याच्या दिशेने नवे पर्व सुरू होईल, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# हरभऱ्यावरील घाटेअळीचे तात्काळ व्यवस्थापन करा : तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील** : तालुक्यातील हरभऱ्याचे पिक बहुतांश ठिकाणी फुलोरा व घाटे भरण्याच्या अवस्थेत आहे. या दरम्यान या पिकावर घाटे अळीच्या प्रादुर्भावाची शक्यता आहे. घाटेअळी ही हरभरा पिकाची प्रमुख किड असुन या किडींची मादी पतंग पानावर, कोवळया शेंडयावर, कळयांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. ही अंडी खसखसीच्या दाण्यासारखी दिसतात. त्यातून २ ते ३ दिवसात अळी बाहेर पडते. ही अळी पानावरील हरीत द्रव्य खरडून खाते. त्यामुळे पाने प्रथम पिवळसर पांढरी होऊन वाळतात व गळून पडतात. थोडया मोठ्या झालेल्या अळया संपूर्ण पाने व कोवळी देठे खाऊन फस्त करतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी तात्काळ त्यावर उपाययोजना करा असे आवाहन




वाशिम तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे यांनी केले आहे.

हरभरा पिक फुलो-यावर आल्यावर हया अळीचा प्रादुर्भाव वाढतो व अळया प्रामुख्याने फुले व घाटयांचे नुकसान करतात. मोठ्या झालेल्या अळया घाटयाला छिद्र करून आतील दाणे खाऊन घाटे पोखरतात. एक अळी साधारणतः ३० ४० घाटयांचे नुकसान करते. त्यासाठी शेतकऱ्यांनी एकात्मिक व्यवस्थापना मध्ये पक्षी थांबे घाटेअळीचे परभक्षक उदा. बगळे, मैना, राघो, निळकंठ, काळी चिमणी ईत्यादी पिकामधे फिरून घाटे अळया वेचून त्यांचे पिकावरील नियंत्रण करतात. अवाजवी किटकनाशकाची फवारणी केल्यास पक्षी किटकनाशकांच्या वासामुळे शेतामधे येणार नाहीत. त्यामुळे किटकनाशकाचा जास्त वापर टाळावा. ज्या शेतामधे मका किंवा ज्वारीचा नैसर्गिक पक्षी थांबे म्हणुन उपयोग केला नसेल त्या शेतामधे बांबुचे त्रिकोणी पक्षी थांबे प्रती हेक्टर २० पक्षी थांबे तयार करून शेतामधे लावावे. त्यामुळे पक्षांचे अळया वेचण्याचे काम सोपे होते.

कामगंध सापळ्याचा वापर करावा. यासाठी घाटे अळीचे कामगंध सापळे हेक्झाल्युर एकरी दोन किंवा हेक्टरी पाच सापळे याप्रमाणे लावावेत. सापळयामधे सतत तीन दिवस आठ ते दहा पंतम आढळल्यास

(१०० किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचे निरीक्षण करून किडींचा बंदोबस्त करण्यासाठी पहिली फवारणी ५० टक्के फुलोरावर असतांना निंबोळी अर्क ५ टक्के किंवा एच.ए. एन. पि. व्हि पिओबी/मिली) ५०० एल.ई. है. किंवा क्विनॉलफॉस २५ ई. सी., २० मि.ली. दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १५ दिसानंतर ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मिली किंवा इमामेक्टीन बेझोएट ५ टक्के एस जी ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७० टक्के एससी ९ मिली किंवा क्लोरॅन्ट्रानीलीप्रोल १८.५ एससी ३ मिली किंवा इंडोक्झाकार्ब १५.८० इसी ६.६ मिली किंवा लॅबडा सायहेलोथ्रीन ०.५ इसी १० मिली वरील पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वरील किटकनाशकांची मात्रा ही साध्या पंपासाठी असुन, पावरस्प्रे साठी मात्रा तिप्पट करावी असे ही आवाहन तालुका कृषी अधिकारी वाशिम अतुल जावळे यांनी केले आहे.

# तळा कॉलेजमध्ये आंतर महाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी:** द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे दिनांक 2 फेब्रुवारी 2026 रोजी स्वातंत्र्य सेनानी प्रभाकर दादा देशमुख आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा व डॉ. प्र. म. जोशी आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी सहा महाविद्यालयातील संघांनी सहभाग घेतला. वक्तृत्व स्पर्धेमध्ये पीएनपी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक, द.ग. तटकरे महाविद्यालय माणगाव द्वितीय क्रमांक तर जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स यांना तृतीय क्रमांक मिळाला. डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.



वादविवाद स्पर्धेसाठी पुरेसे स्पर्धक नसल्यामुळे तृतीय क्रमांकाचे एकच पारितोषिक काढण्यात आले ते पीएनपी महाविद्यालयास देण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ .संजय धनावडे प्रभारी प्राचार्य एम एम जगताप महाविद्यालय महाड व प्रा. प्रसन्न म्हसाळकर वरदा ताई तटकरे महिला महाविद्यालय धाटाव ता. रोहा यांनी काम पाहिले. या समारंभासाठी संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के, अध्यक्ष श्री मंगेश देशमुख, संस्थेचे सचिव श्री महेंद्र कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री महादेव बैकर, श्री दीपक कोटिया श्री बी. के. पटेल, संस्थेचे सदस्य श्री चंद्रकांत खातू आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. भगवान लोखंडे यांनी केले . या स्पर्धेच्या नियमावलींचे वाचन डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी केले. या समारंभ प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नानासाहेब यादव यांनी या स्पर्धांचे औचित्य आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, सचिव श्री महेंद्र कजबजे, यांनी संस्थेच्या वाटचालीमध्ये असणाऱ्या प्रभाकर दादा देशमुख डॉ प्र.म. जोशी यांच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री मंगेश देशमुख यांनी संस्थेच्या विकासाचा आढावा आपल्या अध्यक्षीय भाषणातून घेतला. कार्यक्रमाचे आभार डॉ तृप्ती थोरात यांनी मांडले तर निवेदन प्रा. साक्षी गायकवाड यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकतेर कर्मचारी, विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.

# सौ माधुरी सागर भिसे यांची जिल्हा परिषद गटाच्या प्रचारात आघाडी

## सणसर मुस्लिम बांधवाचा राष्ट्रवादीला जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सौ माधुरी सागर भिसे यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसत आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी सहकारमंत्री श्री हर्षवर्धन पाटील,कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज जाचक भू विकास बँकेचे माजी चेअरमन मुरलीधर निंबाळकर माजी सभापती तुकाराम काळे,सणसर गावचे सरपंच यशवंत पाटील,पार्थ निंबाळकर रणजित निंबाळकर बाजार समितीचे संचालक संग्रामसिंह निंबाळकर,सागर भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या जाहीर सभांऐवजी थेट या मतदारांपर्यंत पोहोचण्यावर भर देत सौ माधुरी भिसे व पंचायत समितीच्या उमेदवार,कु ज्योस्त्ना सुरडकर, हर्षवर्धन लोंढे सध्या घराघरांत जाऊन मतदारांचा आशीर्वाद घेत आहेत.सणसर येथील मुस्लिम बांधवानी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला जाहीर पाठिंबा देण्यात आला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने कम जाहीर सभा रद्द करून शांत,संयमी आणि संवेदनशील या प्रचाराचा मार्ग स्वीकारला आहे.या पार्श्वभूमीवर पक्षाने व घरोघरी जाऊन संवाद या प्रचारावर विशेष



भर दिला असून,सौ माधुरी सागर भिसे यांनी यामध्ये आघाडी घेतली आहे.सागर बाळासाहेब भिसे प्रचारादरम्यान मतदारांशी थेट संवाद साधत असून त्यांच्या समस्या,अपेक्षा आणि स्थानिक प्रश्न समजून घेत आहेत. शेती,पाणीपुरवठा, रस्ते,आरोग्य,शिक्षण तसेच युवकांच्या रोजगारासारख्या मुद्द्यांवर ते स्पष्ट भूमिका मांडत आहेत.विकास, पारदर्शकता आणि सर्वसामान्यांचा सन्मान हा प्रचाराचा केंद्रबिंदू असल्याची दिसून येत आहे.प्रचारा दरम्यान सौ माधुरी भिसे केवळ मतांची मागणी न करता ज्येष्ठ नागरिकांचा आशीर्वाद महिलांचा विश्वास आणि युवकांचा उत्साह मिळवत आहेत.यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार अधिक भावनिक ठरत आहे.

# सुरगाणा महाविद्यालयात "कायदा साक्षरता" विषयावर कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ.चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत कायदा साक्षरता कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रमुख वक्त्या डॉ. मेधा सायखेडकर ( एन. बी. टी. विधी कॉलेज नाशिक) यांनी पहिल्या सत्रात लिंग समानता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की,जगातील सर्वच देशांमध्ये स्त्री पुरुष भेद सुरु असून प्रत्येक क्षेत्रात स्त्रीचे लैंगिक शोषण सुरु आहे. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. कायद्याने सर्वांना समानता प्राप्त करून दिली असली तरी आजही स्त्री - पुरुष समानता दिसून येत नाही. स्त्रियांच्या संरक्षणासाठी अनेक कठोर कायदे असले तरी त्या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नाही. स्त्रियांना अनेक कायद्याची माहीतीच नाही. स्त्रीचा दर्जा तिचा मानसन्मान राखला पाहिजे. स्त्रियानी आपली संस्कृती जपली पाहिजे. महिलांनी स्वतःची सुरक्षितता केली पाहिजे. शैक्षणिक, सामाजिक,




कौटुंबिक, राजकीय. आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात स्त्री -पुरुष असमानता दिसून येत आहे. निर्भया कायदा, पोक्सो कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा यांची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. समाज, चित्रपट, समाजमाध्यमातून स्त्रियांची प्रतिष्ठा जपण्याचं कार्य केले पाहिजे. स्त्रीयांसाठी आर्थिक तरतूद करून समानता निर्माण करावी. कायद्याच्या चौकटीत राहून सर्वांनी कायद्याचे राज्य यशस्वी केले पाहिजे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात वक्ते डॉ. एस. के. मांडवकर (उपप्राचार्य एन. बी. टी. विधी कॉलेज नाशिक) यांनी सांगितले की, भारतीय संविधान हे कायद्याचे उगमस्थान आहे. भारतीय संविधानाच्या सरनाम्याची सुरुवात आम्ही भारतीय जनता अशी असूनसुद्धा आजही सामाजिक समानता निर्माण झालेली नाही. कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान आहेत. संसदेने केलेल्या कायद्याबद्दल सर्व समाजात जागृती करणे गरजेच आहे. कायदे फक्त पुस्तकात राहून चालत नाही. भारतीय राज्यघटनेत तीन परिशिष्टात केंद्र सूची, राज्य सूची आणि समवर्तीसूची दिली असून कायदा निर्मितीची प्रक्रिया खुपच क्लिष्ट आहे असे स्पष्ट केले. कायद्याचं संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायमंडळाची आहे. कलम १७ नुसार अस्पृश्यता मानणे कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. आज सुशिक्षित समाज सर्वात जास्त गुन्हेगार आहेत. कलम ३९ अ नुसार मोफत कायदेशीर सल्ला देण्याची तरतूद केली आहे. त्याचबरोबर मोटार वाहन कायदा, ग्राहक संरक्षण कायदा, रेल्वे अक्ट, हिंदु विवाह कायदा, लोकसेवा हमी कायदा, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, माहिती अधिकार कायदा यासंदर्भात माहिती दिली.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी सांगितले की, स्त्री पुरुष समानता गाठणे खुप मोठा टप्पा आहे. प्रत्येकविद्यार्थ्यांने एक आदर्श नागरिक बनने गरजेचे आहे. त्यासाठी सर्वच क्षेत्रात कायदेविषयक जनजागृती करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक प्रा. सुरेश भोये यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले तर आभार डॉ. माधुरी गावित यांनी मानले यावेळी कार्यक्रमाला डॉ. चंद्रकांत पाटील, प्रा.सुभाष कामडी, प्रा. केशव गावित, प्रा.कृष्णा गांगोडे, प्रा.वर्षा जोशी, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विरोधकांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार सुरू – भूपेंद्र पाटील

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** लोकांच्या सुखदुःखात धावून जाणारे, सातत्याने जनसेवा करणारे भाजप महायुतीचे उमेदवार भूपेंद्र पाटील यांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. प्रचारात आघाडी घेतल्यामुळे विरोधकांची झोप उडाली असून, त्यातूनच विरोधकांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार सुरू असल्याचा आरोप भूपेंद्र पाटील यांनी केला आहे. "आम्ही विभागामध्ये करोडो रुपयांची विकासकामे केली आहेत, मात्र त्याचा कधीही गवगवा केला नाही. जनतेसाठी काम करणे हे आमचे कर्तव्य समजून आम्ही सातत्याने काम केले. मात्र विरोधकांनी लोकांसाठी स्वतः कोणतीही ठोस



विकासकामे न करता, केवळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खोटे आरोप आणि अपप्रचार करण्याचा मार्ग स्वीकारला आहे," असे सांगत जनतेला सत्याची पूर्ण कल्पना असून, विकासाच्या मुद्द्यावरच मतदार कौल देतील, असा विश्वासही भूपेंद्र पाटील यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक मंगळवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी होत असून, या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेरे जिल्हा परिषद गट तसेच नेरे व आदई पंचायत समिती गणांमध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांना नागरिकांचा उदंड व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

सामाजिक प्रश्नांची जाण असलेले व जनतेशी थेट नाळ जोडणारे आत्माराम बाळू भस्मा (नेरे जिल्हा परिषद गट), नेरे पंचायत समिती गणातून वर्षा सचिन केवारे तसेच आदई पंचायत समिती गणातून भूपेंद्र सदानंद पाटील हे सर्व उमेदवार कार्यक्षम, विकासाभिमुख व लोकाभिमुख असून त्यांच्या कामावर जनतेचा विश्वास आहे. दरम्यान, शेतकरी कामगार पक्षाची अवस्था बिकट झाल्याने त्यांच्या उमेदवारांकडून विकासावर चर्चा न करता नागरिकांमध्ये गैरसमज पसरवण्याचा व अपप्रचार करण्याचा सपाटा सुरू असल्याची टीका भूपेंद्र पाटील यांनी केली. यावेळी बोलताना त्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला.

विलास फडके यांनी फक्त जिल्हा परिषदेचेची पाटी सोबत मिरवली आहे. मात्र त्यांनी नेमकी कोणती विकासकामे केली, असा सवाल भूपेंद्र पाटील यांनी उपस्थित केला. विभागातील विकासकामांकडे दुर्लक्ष करून त्यांनी कायम राजकारणालाच प्राधान्य दिले, त्यामुळे विलास फडके निष्क्रिय ठरले असल्याची टीकाही त्यांनी केली."माझा स्वभाव कुणावर टीका-टिप्पणी करण्याचा नाही. मात्र विनाकारण आमची बदनामी करून मतदारांना दिशाभूल केली जात असेल, तर ते योग्य नाही. विलास फडके यांनी जिल्हा परिषदेची पाटी मिरवत काय काम केले याचे आत्मचिंतन करावे, त्यानंतरच मतदारांकडे मत मागायला जावे," असे ठाम मत भूपेंद्र पाटील यांनी व्यक्त केले.

भाजप महायुतीच्या उमेदवारांच्या माध्यमातून सर्वांगीण विकास, पारदर्शक प्रशासन व जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# भवानीनगर येथे अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे भावपूर्ण दर्शन

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे दर्शन भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या प्रांगणात बुधवार (दि. ४ फेब्रुवारी) रोजी भावपूर्ण वातावरणात पार पडले. बारामती येथून नीरा नरसिंगपूर येथे विसर्जनासाठी नेत असलेल्या अस्थीकलशाचे दर्शन घडावे, यासाठी कारखान्याच्या प्रांगणात विशेष व्यवस्था करण्यात आली होती.यावेळी सकाळपासूनच परिसरात शोकमय वातावरण होते. अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देत कारखान्याचे चेअरमन, सर्व संचालक मंडळ, सभासद, कामगार, व्यापारी तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तर मनात अजितदादांबद्दलचा आदरभाव दिसून येत होता.माजी सैनिक व विद्यमान संचालक बाळासाहेब कोळेकर तसेच कामगार नेते



युवराज रणवरे यांनी श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या वतीने अस्थीकलशास पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. अजितदादा पवार यांनी सहकार, समाजकारण आणि जनसेवेत दिलेल्या योगदानाचा यावेळी उपस्थितांनी भावनिक शब्दांत उल्लेख केला.अस्थीकलश दर्शन कार्यक्रम शांततामय व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.दर्शनानंतर अस्थीकलश नीरा नरसिंगपूरकडे विसर्जनासाठी रवाना झाला अजितदादा पवार यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी असल्याची भावना यावेळी उपस्थितांमधून व्यक्त होत होती.

# खिडकाळी गावातील श्री गावदेव-गांवदेवी आई मंदिराचा ९ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत(कल्याण ग्रामिण प्रतिनिधी) :** मंगळवार दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री गांवदेव-गांवदेवी आई मंदिराचा नववा वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये खिडकाळी गावातील महिलांचा सिंहाचा वाटा होता. जवळ जवळ २१ बचत गट मधील १६७ महिलांचा सहभाग होता. मंदिराची सजावट, मंदिराबाहेरील मंडप, स्टेज, विजेची रोशनाई, भोजनालय व्यवस्था अशा विविध विभागात गावातील तरूण, प्रौढ, बालक आणि महिला सेवा करण्यासाठी कटिबध्द होते.

गांवदेवी मंदिराच्या प्रांगणामध्ये सौ.दक्षता रविंद्र पाटील आणि सौ.किर्ती राजन पाटील यांनी अर्धनारी नटेश्वरची सुंदर आणि आकर्षक रांगीळी प्रतिकृती साकारलेली होती.सदर प्रतिकृती सर्वांचे लक्ष केन्द्र करीत होती.सकाळपासून रात्रीपर्यत कार्यक्रमांची उत्कृष्ट आखणी केली होती.सकाळी ७ ते सायं.४ वाजेपर्यंत अभिषेक व आरती,पालखी मिरवणूक, बुध्देश्वर मंदिर व गांवदेवी मंदिरात श्री सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. सायं.४ ते ६ श्री खिडकाळेश्वर महिला मंडळ यांचा हरिपाठ होता.सायं.७ ते ९ वा.ह.भ.प.सौ. प्रितीताई करण पाटील (भिवंडी) यांची सुश्राव्य किर्तनसेवा झाली. त्यानंतर मान्यवर व दानशूरांचे स्वागत सन्मान करण्यात आले.

कार्यक्रमाचे आकर्षण ठरले ते म्हणजे मंदिरावर केलेल्या फटाक्यांची आतीषभाजी.!उपस्थितांनी सदर आकर्षक दृश्य आपल्या जवळील मोबाईलमध्ये संग्रहीत केले. दरवर्षी




प्रमाणे यावर्षी सुध्दा खिडकाळी मधील विशेष योगदान असलेल्या ३ रत्नांना 'खिडकाळी गौरव' म्हणून आकर्षक सन्मानचिन्ह,शॉल व श्रीफळ देऊन सन्मानीत करण्यात आले. १) कु.ओमकार विनोद ठाकुर (दहावी-गुण-९५%),२) कु.नाजुका अशोक म्हात्रे (दहावी-९२%),३) कु.आतिष निलेश घरत (कुस्तीमध्ये जिह्यात प्रथम). अशाप्रकारे सन्मानांची परंपरा यावर्षीही यशस्वीपणे पार पडली.

ठाणे महानगरपालिका वार्ड क्र २९ मधील नवनिर्वाचित नगरसेवक १) श्री. बाबाजी पाटील साहेब, २) सौ.अर्चना निलेश पाटील आणि ३) सौ.वेदीका साहिल पाटील यांनीही सदिच्छा भेट देऊन ग्रामस्थांचे कौतुक व शुभेच्छा दिल्या. तसेच पंचक्रोषितील राजकारणी, आध्यात्मिक, उद्योगपती, समाजसेवक या सर्व मान्यवरांनी सुध्दा दर्शनाचा लाभ घेतला. जेष्ठ पत्रकार श्री.सतीश पाटील यांनीही सदिच्छा भेट दिली.त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावर्षीही विशेष आकर्षण म्हणून दर्शनरांगेत महिलांसाठी 'लकी-ड्रॉ' बॉक्स ठेवण्यात आला होता. जवळ जवळ २०० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवला होता. रात्री १०:३० नंतर लोकमनोजनार्थ विशेष कार्यक्रम हास्य प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांचा 'याल तर हसाल' हा धमाल विनोदी कार्यक्रम आयोजित केला होता. अडीच तास त्यांनी संजीवन विनोदी फटाक्यांची आतीषभाजी केली आणि सर्वांची हसवून रक्ताभिसरण क्रिया सुरळीत केली. कार्यक्रमाला सुरूवात करण्याआगोदर गावातील उत्कृष्ट ढोलकी वादक श्री. शालीक कमळू पाटील यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून मंचाला मानवंदना केली.

कार्यक्रमाच्या सूत्रसंचलनाचा भार श्री.सतीश पाटील यांनी उत्कृष्टपणे पेळला.सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी श्री.संजय पाटील,श्री. रूपेश पाटील,श्री.अनिल म्हात्रे,श्री. राजेश पाटील,श्री.धनेश ठाकुर,श्री.राजन पाटील,सौ.शुभांगी ठाकुर,श्री.नवनाथ ठाकुर, श्री.जगदीश पाटील आणि श्री. चंद्रकांत पाटील यांनी खूपच मेहनत घेतली. गेली ९ वर्ष कृतज्ञभवानुबंध गृप हा सदर कार्यक्रमाचे नियोजन करत असतो. "जर कार्यक्रम यशस्वी करायचा असेल तर उत्कृष्ट नियोजन करायला हवे".असे कवी नवनाथ ठाकुर यांनी सांगितले.

म्हणूनच उत्कृष्ट नियोजनासाठी 'कृतज्ञभावानुबंध गृप' सदैव कटिबध्द असतो. सदर कार्यक्रमासाठी कृतज्ञभावानुबंध गृपसोबतसोबत आई गांवदेवी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष-श्री. यशवंत पाटील आणि इतर सभासदही सक्रिय होते. पंचक्रोषितील हजारो भाविकांनी श्री गांवदेव-गांवदेवी आई मंदिराच्या ९ व्या वर्धापन दिन सोहळयाचा आनंद घेतला.

# ॲड.नकुलदादा देशमुख यांच्या उपस्थितीत रिसोड ग्रामीणमध्ये भाजपा बूथ प्रमुख संवाद मिटिंग उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** रिसोड ग्रामीण मंडळ अंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या बूथ प्रमुखांची महत्त्वपूर्ण संवाद मिटिंग आज रिसोड येथे मोठ्या उत्साहात पार पडली. पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली.

या वेळी आदरणीय प्रदेशाध्यक्ष श्री.रविंद्रजी चव्हाण साहेबयांच्या मार्गदर्शनाखाली आलेल्या विशेष टीमने उपस्थित बूथ प्रमुखांशी थेट संवाद साधला. आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी पक्षाची रणनिती, तयारी व कार्यकर्त्यांची



भूमिका यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवणे, नागरिकांच्या अडचणी जाणून घेणे व त्यावर प्रभावी उपाययोजना करणे, तसेच बूथ स्तरावर काम अधिक गतिमान करण्याचे आवाहन करण्यात आले.

या बैठकीत भाजपा नेते ॲड. नकुलदादा देशमुख यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येक बूथ प्रमुख हा पक्षाचा कणा असून त्यांच्याच माध्यमातून संघटन मजबूत होते. एकजुटीने, शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास आगामी निवडणुकांमध्ये निश्चित यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, बूथ प्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही मिटिंग आगामी निवडणुकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली असून रिसोड तालुक्यात भाजपा अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# अंबोडा येथील श्री गजानन महाराज यात्रा महोत्सवाला प्रारंभ; सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव(यवतमाळ) :** तालुक्यातील अंबोडा गावात २ फेब्रुवारी पासून यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली आहे. यामध्ये भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा संगम अनुभवायला मिळणार आहे. श्री गजानन महाराज, शेगाव यांच्या प्रकटदिनानिमित्त श्री गजानन महाराज संस्थान, अंबोडा यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली आहे. यामध्ये ज्ञानयज्ञ, अखंड हरीनाम सप्ताह, यात्रा महोत्सव व कलशारोहण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता 'श्रीं' च्या अभिषेकाने सुरुवात झाली आहे. त्यानंतर विधिवत श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञास प्रारंभ होणार असून ९ फेब्रुवारीला सांगता होणार आहे. यावेळी श्रीमद् भागवत कथेचे प्रवचन मुडाणा येथील निजधाम आश्रमचे हभप तानाजी बापू यांच्या वाणीतून होणार आहे. यावेळी डॉ. राम बेलगमवार, डॉ. श्रीकांत देशमुख, बाळू वाकोडे, शिवराज ठाकरे, मनोज तगडपल्लेवार यांच्या हस्ते सपत्नीक धार्मिक विधी पार पडणार आहेत. ९ फेब्रुवारीला सकाळी ९.१५ वाजता श्री संतोषी



माता मंदिर व श्री हनुमान मंदिर येथे कलशारोहण कार्यक्रम होणार आहे. हा सोहळा बालयोगी व्यंकटस्वामी महाराज, हभप तानाजी बापू मुडाणकर यांच्या हस्ते होणार आहे. ८ फेब्रुवारीला श्री गजानन महाराजांच्या प्रगटदिनानिमित्त विशेष अभिषेक व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शेवटी महाप्रसाद वितरणाने महोत्सवाची सांगता होणार आहे. या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन अंबोडा येथील श्री गजानन महाराज संस्थानचे अध्यक्ष श्री हनुमंतराव देशमुख व मंदिर संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान; जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत बैठक कॉपी प्रकरण आढळल्यास होणार कठोर कारवाई

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक :** : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत १० फेब्रुवारीपासून बारावी, तर २० फेब्रुवारीपासून दहावीच्या परीक्षा सुरू होत आहेत. या परीक्षा अकोला जिल्ह्यात पूर्णतः कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात, यासाठी शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन व संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.

कॉपीमुक्त अभियानासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे, शिक्षणाधिकारी योजना संजयकुमार झापे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य डॉ.रत्नमाला खडके, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी माध्यमिक प्रमोद टेकाडे,सुभाष भालेराव,प्राथमिक उपशिक्षणाधिकारी जितेंद्र प्रधान, विस्तार अधिकारी विनोद मानकर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, यंदा राज्य शासनाने दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत. त्याअनुषंगाने सर्व परीक्षा केंद्रांवरील प्रत्येक वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक राहणार आहे.

गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित केंद्रप्रमुखांना सीसीटीव्ही बसविण्याबाबत लेखी सूचना द्याव्यात. ज्या केंद्रांवर सीसीटीव्ही नसल्याचे आढळून येईल, त्या ठिकाणी शिक्षकांची अदलाबदल करण्यात येईल, तसेच संबंधित केंद्राची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव




पाठविण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

परीक्षा काळात वीजेचे भारनियमन झाल्यास बॅटरी किंवा इन्व्हर्टरची पर्यायी व्यवस्था ठेवावी. संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांच्या परिसरात व्हिडीओ शुटींग, भरारी पथक व बैठ्या पथकांमार्फत विशेष तपासणी करण्यात येणार आहे. अनुचित प्रकार आढळल्यास तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. परीक्षा केंद्रांवर एका बाकावर एकच विद्यार्थी बसविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महत्त्वाच्या विषयांच्या दिवशी कॉपीचे प्रकार होऊ नयेत, यासाठी विशेष दक्षता घेण्यात येणार आहे.

**परीक्षा केंद्र परिसरात जमावबंदी आदेश**

परीक्षा काळात सर्व परीक्षा केंद्रांच्या 100 मीटर परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात येत आहेत. या आदेशानुसार सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी/मोबाईल केंद्र, आयएसडी, फॅक्स, झेरॉक्स केंद्र तसेच ध्वनिक्षेपके बंद राहणार आहेत. मात्र, परीक्षार्थी, परीक्षा कामकाजाशी संबंधित अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व पोलीस यांना हा आदेश लागू राहणार नाही. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**कॉपी आढळल्यास कठोर कारवाई**

कोणताही परीक्षार्थी कॉपी किंवा गैरवर्तन करताना आढळल्यास त्याच्याविरोधात पोलीस गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. तसेच संबंधित विषयाचा निकाल रद्द करण्यात येईल. गंभीर प्रकरणात संपूर्ण परीक्षेचा निकालही रद्द केला जाऊ शकतो, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.दहावीची परीक्षा 20 फेब्रुवारी ते 18 मार्चदरम्यान असून, विद्यार्थी संख्या 26 हजार 353 व केंद्र संख्या 118 आहे. बारावीची परीक्षा 20 फेब्रुवारी ते 11 मार्चदरम्यान असून, विद्यार्थी संख्या 26 हजार 287 व केंद्र संख्या 87 आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत दक्षता समिती स्थापण्यात आली आहे.

परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अमरावती विभागात विभागीय आयुक्त, शिक्षण उपसंचालक, जिल्ह्यात जिल्हाधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी, योजना शिक्षणाधिकारी, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभागातील महिला अधिकारी व कर्मचारी यांच्या स्तरावर भरारी पथके निर्माण करण्यात आली आहेत.

पेपर वितरण केंद्र परिरक्षक 11 आहेत.

संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांच्या ठिकाणी दहावी परीक्षेसाठी 21 व बारावीसाठी 22 बैठी पथके आहेत.

## श्रीमद भागवत महापुराण कथा दिंडी सोहळा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** रणगांव ता. रावेर येथे श्रीमद् भागवत महापुराण कथा दिंडी सोहळा नुकताच कार्यक्रम संपन्न नुकताच रंणगांव ता. रावेर येथे श्रीमद् भागवत महापुराण कथा सप्ताह व दिंडी सोहळा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला कथा वाचक ह. भ. प.शरद बुवा महाराज गोजोरे येथील महाराज हे कथा वाचक होते. संपूर्ण सप्ताह भर विविध महाराजांच्या उपस्थिती मध्ये किर्तनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शेवटच्या दिवशी गांवातील मुख्य रस्त्यावरून छान सुंदर रांगोळी काढुन दिंडी काढण्यात आली होती.त्यांचा लाभ थोरगव्हान सुतगांव रायपुर रणगांव गहुखेडा तासखेडा उदळी व असंख्य बंधू भगिनी नागरिकांनी लाभ घेतला.काल्याचे किर्तन संपन्न झाले.

त्यावेळी भाजपा अनुजाती मोर्चा राज्य सचिव प्रा. संजय मोरे सौ. मायाताई संजय मोरे स्वप्नीक राष्ट्रीय स्वयं संघ 100 वर्ष पुर्ती निमित्त रणगांव ता. रावेर येथे गांवकरी





यांच्या सहकार्याने राष्ट्रीय स्वयं संघ " नमस्ते सदा वत्सले मातृभुमे " ही प्रार्थना घेऊन भारत माता की जय जयघोषाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रथम कथावाचक गोजोरे येथील ह. भ. प. शरद बुवा महाराज यांचा शाल श्रीफळ पुषहार देऊन सन्मान करून स्वप्नीक आशीर्वाद घेतला.त्या नंतर भजनी मंडळ भागवत महाराज एकनाथ महाराज निलेश महाराज भागवत चौधरी महाराज देवेंद्र महाराज निंभोरासिम धगन महाराज दिनकर महाराज निवृत्ती कोळी महाराज संजय महाराज पाटील तासखेडा त्र्यंबक महाराज सरपंच संदीप कोळी यांचा रुमाल टोपी श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक कडू धोंडू चौधरी भागवत चौधरी पुंडलिक चौधरी काशिनाथ चौधरी पोलीस पाटील बळीराम पाटील पंडित पाटील धनराज चौधरी सोपान चौधरी सोपान पाटील भाऊलाल पाटील लक्ष्मण पाटील सोपान चौधरी चिंतामण चौधरी रमेश चौधरी भागवत कोळी उत्तम चौधरी अर्जुन चौधरी हेमराज कोळी धनराज कोळी धनंजय कोळी बिजलाल पाटील पुंडलिक पाटील वासुदेव कोळी सोपान कोळी बळीराम चौधरी व बाल टाळकरी यांचा श्रीफळ रुमाल टोपी देऊन सन्मान करण्यात आला. दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला रणगाव भजनी मंडळी सह पंचकोशातील भजनी मंडळी विजय मोरे उपस्थित होती.

## रायगडची क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** खांदेश्वर नवीन पनवेल पश्चिम येथे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन, रायगड ची जिल्हास्तरीय क्लासिक सर्व वयोगटाची

पॉवरलिफ्टिंग स्पर्धा पार पडली. रविवार दिनांक ०१फेब्रुवारी २०२५रोजी आगरी शिक्षण संस्थाचे माध्यमिक विद्यालय येथे झालेल्या या स्पर्धेत अनेक नामवंत पुरुष व महिला खेळाडू आले होते.या स्पर्धेचे उद्घाटन पॉवरलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष गिरीश वेदक,महाराष्ट्र पॉवर लिफ्टिंग संघटनेचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित संजय सरदेसाई,सहसचिव छत्रपती पुरस्कार सन्मानित संजय माधव,मुंबई शहर संघटनेचे शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित अनंत चाळके, क्रीडा मार्गदर्शक अधिकारी रायगड निळकंठ आखाडे , आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त



रामचंद्र गावडे,सनदी लेखापाल राजाराम गोळे,पनवेल तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पंकज भगत यांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेची सर्व व्यवस्था सदस्य संदीप कृष्णा पाटकर, सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव,सदस्य सुभाष दगडू टेंबे यांनी केली होती. तर सहाय्यक म्हणून संदीप स्वरूप पाटकर,भूषण सुरेश सरोज यांनी महत्वाची जबाबदारी पार पाडली.

या स्पर्धेस साहित्य हनुमंत खरात (कर्जत) आणि विवेक सांबरे (गोवेली कल्याण) यांनी उपलब्ध केले होते. नवीन पनवेल चे सामाजिक कार्यकर्ते प्रदीप उर्फ भाऊ घरत आणि खांदेश्वर चे सामाजिक कार्यकर्ते तथा मंडप डेकोरेटर प्रदीप म्हात्रे यांनी सदिच्छा भेट दिली होती. याप्रसंगी सुभाष टेंबे यांचे हस्ते त्यांचा गौरव केला.स्पर्धेसाठी पंच म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सतीश पाताडे, राष्ट्रीय खेळाडू गोपीनाथ पवार, अंकुश सावंत, उत्तम धुरी,जितेंद्र यादव (सर्व,मुंबई),नवी मुंबईचे राकेश पाटीलआणि रामचंद्र गावडे (रायगड,) यांनी काम केले. लोडर म्हणून विराज पावसकर, आयुष यादव, अविनाश शेट्टी, मोरेश कारळे, प्रांजल पाटेकर, श्रवण जाधव, महेश वाघमारे, शशिकांत वाघमारे, यांनी मदत केली. उपस्थित सर्व पंच , मदतनीस यांना देऊन गौरविण्यात आले. तर हजर असलेल्या निवडक पंचांना पाटकर कुटुंबीय यांच्यावतीने बॅगा देण्यात आल्या.या स्पर्धेत सब ज्युनिअर स्ट्रॉंगबॉय अद्वैत भोसले (कॉडझील्हा जिम महाड), ज्युनिअर मुले स्ट्रॉंग बॉय अथर्व लोधी(संसारे फिटनेस, पेण) सिनिअर पुरुष मध्ये नितीन बिरवाडकर

(कॉडझील्हा जिम महाड),ओव्हरऑल मास्टर स्ट्रॉंगमन महेश पाटील ( शिवतेज जिम,वावोशी - खोपोली)आणि महिलांमध्ये ओव्हर ऑल स्ट्रॉंगवूमन अमृता भगत (पॉवर हाऊस क्लब खोपोली)झाली.सांघिक विजेतेपद ओव्हर ऑल प्रथम क्रमांक (फिटनेस ऑन जिम तक्का पनवेल,) द्वितीय क्रमांक क्वाडझिल्हा जिम, (महाड), तर तृतीय क्रमांक आयएनडी क्लब (कर्जत) यांना मिळाला

## दिल्लीतील राष्ट्रीय तांग सू दो स्पर्धेत कुं. दिवीजा मसुरकरची दमदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : दिल्ली येथे दिनांक १६ ते १८ जानेवारी दरम्यान आयोजित राष्ट्रीय तांग सू दो स्पर्धेत कुं. दिवीजा आशिष मसुरकर हिने उल्लेखनीय यश संपादन करत सुवर्ण व रौप्य पदके पटकावली. तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून क्रीडाप्रेमींनी तिचे कौतुक केले आहे.

इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेणारी दिवीजा लहान वयातच मार्शल आर्ट्स क्षेत्रात सातत्याने मेहनत घेत आहे. नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांचा पाठिंबा यांच्या जोरावर तिने विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत





अनेक ठिकाणी सुवर्ण व रौप्य पदकांची कमाई केली आहे. दिल्ली येथे झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील खेळाडूंमध्ये तिने उत्कृष्ट कौशल्य, चपळता आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवत पदकांवर आपले नाव कोरले.

दिवीजाच्या या यशामागे तिच्या प्रशिक्षकांचे परिश्रम तसेच संस्थेचे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले आहे. कठोर सराव आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणामुळे ती सातत्याने प्रगती करत असून भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची तिची महत्त्वाकांक्षा आहे. तिच्या यशाबद्दल शाळा, संस्था आणि पालकांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दिवीजा मसुरकर हिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळत आहे. चिकाटी, परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर यश मिळवता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणून दिवीजाकडे पाहिले जात आहे. तिच्या पुढील क्रीडा प्रवासासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## लेखक सोमनाथ दळवी यांच्या जिव्हाळा पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**रोहा/रायगड :** लेखक सोमनाथ दळवी प्रकाशित या पुस्तकामध्ये वैचारिक, प्रेरणादायी स्वरूपाचा आशय मांडण्यात आला असून मानवी जीवनातील संघर्ष, भावना, समाजातील वास्तव आणि मूल्यव्यवस्था यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. लेखकाने आपल्या सुलभ, ओघवत्या आणि विचारप्रवर्तक लेखनशैलीतून वाचकांना अंतर्मुख करणारा अनुभव दिला आहे.

पुस्तकातील विषयवस्तू ही आजच्या समाजाशी जोडलेली असून तरुण पिढीपासून ज्येष्ठ वाचकांपर्यंत सर्वांना विचार करायला लावणारी आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचकांच्या



मनात नक्कीच आपले स्थान निर्माण करेल, असा विश्वास न्यू इंग्लिश स्कूल चनेरा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. के .बी. पाटील यांनी व्यक्त केला.

न्यू इंग्लिश स्कूल चनेरा तालुका रोहा येथे लेखक सोमनाथ दळवी मागील काही काळापासून शिक्षक म्हणून कार्यरत होते. विद्यालयातील शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनीही जिव्हाळा पुस्तकाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत. असेच लेखन त्यांच्या हातून घडो समाजातील वास्तविकता लेखनाच्या माध्यमातून पोहचवण्याचा मानस लेखक सोमनाथ दळवी यांच्याकडून घडावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या पुस्तक लेखनामागे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे, व संस्थेचे पदाधिकारी यांची प्रेरणा आहे असे लेखक सोमनाथ दळवी यांनी सांगितले.

## माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे यांना मातृशोक

### जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी केले सांत्वन



**उलवे :** न्हावा येथील माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे यांच्या मातोश्री बबीबाई दामोदर म्हात्रे (वय-९१) यांचे नुकतेच वृद्धापकाळामुळे निधन झाले. हे समजताच आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी बुधवारी जितेंद्र म्हात्रे परिवाराचे सांत्वन केले आणि सुख-दुःखात आपल्या मागे आम्ही खंबीरपणे आहोत, असा आशावाद दिला.

दिवंगत बबीबाई म्हात्रे यांनी गरिबीतून वाटचाल करीत कुटुंब सावरले. जितेंद्र म्हात्रे हे सरपंच झाल्यानंतर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. त्यांच्या मागे मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य गुरुवारी (१२ फेब्रुवारी) न्हावा येथे राहत्या घरी होणार आहे.( दैनिक युवक आधार )

## ग्रुप ग्रामपंचायत पाली–देवद–सुकापूर, पनवेल येथे निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार; शेकडो मतदारांची नावे अचानक वगळली

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणंकर :** पनवेल तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत पाली–देवद–सुकापूर येथे लोकशाहीवर घाला घालणारा प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर शेकडो मतदारांची नावे मतदार यादीतून कमी करण्यात आली आहेत.

विशेषम्हणजे, याच मतदारांनी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदान केले होते. मात्र आता अचानक त्यांची नावे गायब झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संभ्रम व संताप निर्माण झाला आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत कोणालाही पूर्वसूचना देण्यात आलेली नाही,नोटीस बजावण्यात आलेली नाही,ना हरकत नोंदवण्याची संधी देण्यात आली नाही.

हे सर्व पाहता निवडणूक आयोगाचा अत्यंत निष्काळजी व भोंगळ कारभार असल्याचे स्पष्ट दिसून येते.मतदानाचा मूलभूत हक्क असा सरळपणे हिरावून घेतला जात असताना प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. *लोकशाहीत मतदार महत्त्वाचा की केवळ आकडे? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

नागरिकांनी प्रश्न विचारल्यावर कुणाकडेही ठोस उत्तर नाही. एकीकडे “मत द्या” असे आवाहन करायचे आणि दुसरीकडे *मतदारांची नावेच काढून* टाकायची, हा कोणता न्याय?

या प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर संशय निर्माण झाला आहे,लोकांचा निवडणूक यंत्रणेवरील विश्वास डळमळीत झाला आहे या गंभीर प्रकाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी व वगळलेली नावे त्वरित मतदार यादीत समाविष्ट करावीत, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.लोकशाही टिकवायची असेल, तर *निवडणूक आयोगाने अशी मनमानी थांबवावी, अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नागपूर पोलिसांची मोठी कारवाई: सदर परिसरात दोन तरुणांना प्राणघातक शस्त्रासह अटक

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ५ ने बुधवारी (४ फेब्रुवारी) सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धडक कारवाई करत दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. आरोपींकडून एक धारदार लोखंडी चाकू जप्त करण्यात आला असून, त्यांच्यावर भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




**गुप्त बातमीदाराने दिली माहिती**

गुन्हे शाखा युनिट ५ चे पथक बुधवारी दुपारी सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, त्यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, बुलंदशहा गोंड राजे चौक (बाटा शोरूम जवळ) येथे काही तरुण संशयास्पद रितीने फिरत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी तातडीने सापळा रचला आणि एमएसईबी डीपीजवळ झाडाखाली उभे असलेल्या दोन तरुणांना ताब्यात घेतले.

**आरोपींची ओळख आणि जप्त मुद्देमाल**

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत:

१. समीर उर्फ यश निशान गायकवाड (वय १९ वर्षे), रा. ख्रिश्चन कॉलनी, जरीपटका.

२. प्रज्वल उर्फ मारी महादेव मेश्राम (वय १९ वर्षे), रा. कुशी नगर, जरीपटका.

पोलिसांनी आरोपींची अंगझडती घेतली असता, त्यांच्याकडे १,००० रुपये किमतीचा एक लोखंडी चाकू मिळून आला. पोलिसांनी सदर शस्त्र जप्त करून दोन्ही आरोपींविरुद्ध कलम ४/२५ सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

**अशी झाली कारवाई**

ही कारवाई नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल, सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, आणि पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) डॉ. राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या मोहिमेत गुन्हे शाखा युनिट ५ चे पोलीस निरीक्षक विनायक गोल्हे, सपोनि गणेश कदम, विजय गिते आणि त्यांच्या पथकातील राजू राठोड, राजेंद्र टाकळीकर, मुकेश राऊत, रूपेश नानवटकर व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

# पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासासाठी आवश्यक भूसंपादन गतीने पूर्ण करावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक/मुंबई :** राज्यात पायाभूत सुविधा तसेच औद्योगिक विकासासाठी भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी, प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव




पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलरासु, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

राज्यात औद्योगिक विकासासाठी विविध विभागांमध्ये एकूण ८,९६९ एकर क्षेत्र उपलब्ध असून नव्याने २०,४३१ एकर जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी मोठी मागणी येत असून उद्योजकांना लागणाऱ्या जागेचा विचार करुन एमआयडीसीने एक लाख एकर जागा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. मुंबई-पुणे-नागपूर बरोबरच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी भागांमध्ये गुंतवणूकदारांकडून जमिनीची मागणी वाढत आहे. यादृष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या कामांना गती द्यावी. यासाठी शासन स्तरावरून आवश्यक ते साहाय्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विविध जिल्ह्यातील 'एमआयडीसी'च्या भूसंपादनाबरोबरच 'एमएसआरडीसी'कडील शक्तिपीठ एक्स्प्रेस वे, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नागपूर-गोंदिया एक्स्प्रेस वे, भंडारा-गडचिरोली एक्स्प्रेस वे, नागपूर चंद्रपूर एक्स्प्रेस वे, नवेगाव-सुरजागड मिनरल कॉरिडॉर, जालना नांदेड एक्स्प्रेस वे आदी प्रकल्पांच्या सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेचाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आढावा घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सुरू असलेले सर्व प्रकल्प येत्या तीन वर्षात पूर्ण होतील, असे नियोजन करावे. यासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. त्याचबरोबर वनक्षेत्र नसलेल्या जास्तीत जास्त सलग जागेचे भूसंपादन करुन ती उद्योजकांना उपलब्ध करुन द्यावीत. याशिवाय, विविध विभागाकडील शासकीय जमिनी औद्योगिक वापरासाठी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करावा, यामुळे उद्योजकांना कमी दरात भूखंड उपलब्ध होऊन राज्यातील औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी, कोकणातील भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कुठेही वन जमिनीचे संपादन केले नसल्याची माहिती दिली. चंद्रपूर जिल्ह्यातील अतिरिक्त गोंडपिंपरी औद्योगिक क्षेत्रात उद्योजकास जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव मान्यतेसाठी प्राप्त झाला आहे. या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल, असेही त्यांनी उद्योगमंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले.

बैठकीत 'एमआयडीसी' आणि 'एमएसआरडीसी'च्या वतीने विविध ठिकाणी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून चिया सिड उत्पादन, अन्नप्रक्रिया, मत्स्य व्यवसायाची पाहणी; उत्पादनाच्या ब्रँडींगवर लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक :** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज भातकुली तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी चिया सिड उत्पादन, अन्नप्रक्रिया उद्योग आणि मत्स्य व्यवसाय प्रकल्पांना भेटी देऊन आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्प उभारणीपासून ते होणाऱ्या फायद्याची माहिती घेतली.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी रामा, ता. भातकुली येथे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत अमोल पाठक यांनी उभारलेल्या दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया उद्योगाला भेट दिली. यावेळी त्यांनी प्रकल्प निर्मिती, उत्पादन क्षमता, विस्तार, प्रकल्पापासून होणारे फायदे याबाबत माहिती घेतली. खवा, पनीर या व्यतिरिक्त दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करावी, तसेच उद्योगाचा विस्तार करावा, उद्योगाला संस्थात्मक स्वरूप देऊन ब्रँडींगवर लक्ष देण्याची सूचना केली. तसेच शेतकऱ्यांना महाविस्तार - एआय मोबाईल ॲप्लीकेशनचा सक्रीय वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले

त्यानंतर टाकरखेडा, शंभु येथे आत्मा अंतर्गत



44 एकरमध्ये चिया सिडचे प्रात्यक्षिक राबविण्यात येत आहे. यातील योगेश देशमुख यांच्या दोन एकरवरील चिया सिड लागवडीची श्री. येरेकर यांनी पाहणी केली. सदर उत्पादनापासून शेतकऱ्यांना होणारे फायदे याबाबत त्यांनी माहिती घेतली. चिया सिड लागवडीबद्दल जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. प्रत्यक्ष उत्पादनानंतर झालेल्या लाभाची माहिती देण्याचे यावेळी त्यांनी सांगितले. तसेच कृषी मॅपर ॲपमध्ये पीक प्रात्यक्षिक तपशील माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच नांदगाव पेठ एमआयडीसीतील सावर्डी येथील ऑस्टेक प्रायव्हेट लिमिटेड या मत्स्य व्यवसाय प्रकल्पाची पाहणी केली. दौऱ्यात उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, दादासाहेब दराडे, तहसीलदार विजय लोखंडे, अक्षय मंडवे, तालुका कृषी अधिकारी उत्कर्षा भोसले, प्रशांत गुल्हाने आदी उपस्थित होते.

# सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचा दौरा कोया कृषी कुंभ' महोत्सवाच्या उद्घाटनासह विविध विकासकामांचा घेणार आढावा

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक गडचिरोली :** राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते विविध शासकीय कार्यक्रमांना उपस्थित राहणार असून जिल्हयातील महत्त्वाच्या विभागांच्या कामाचा आढावा घेणार



आहेत. त्यांच्या दौऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

दिनांक ५ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.०० वा. 'कोया कृषी कुंभ २०२६' या कार्यक्रमास सोनापूर येथील कृषी महाविद्यालय प्रांगणात उपस्थिती, दुपारी १.०० वा. जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे दिव्यांग प्रमाणपत्र एकत्रित वितरण कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी २.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात गडचिरोली जिल्ह्यातील 'पाणंद रस्ते' संदर्भातील आढावा बैठक. दुपारी ३.३० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व पणन महासंघ विभागाची आढावा बैठक. संध्याकाळी ४.०० वा. गडचिरोली नगर परिषदेत नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांची भेट आणि नगर परिषदेच्या कामाची आढावा बैठक. सायं ५ वा. रामटेककडे प्रयाण.

# नागराजा उसबदातचे नासिक प्रशस्ती लेख

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक**

**(५) नाशिक येथील लेण्यात**

"सिद्धम! खहरत (क्षहरत) राजा नहपानाचा जावई, दीनीकाचा पुत्र उदार उसभदात ज्याने तीन लाख गायी दान दिल्या आहेत, ज्याने सुवर्णाचे दान देऊन बामिसा नदीवर विहाराची स्थापना केली आहे. ज्याने देवा श्रमणांना सोळा गावे दिली आहेत. जो दरवर्षी १ लाख सिद्ध श्रमण भिक्षूंना भोजन देतो, ज्याने भारुकच्छ, दशपूर, गोवर्धन आणि सोपारिक येथे चौकोनी आरामगृहे स्थापन केली आहेत, ज्याने बाग-बगीचे, पाण्याचे हौद आणि पिण्याच्या पाण्याचे झरे निर्माण केले आहेत, ज्याने पुण्य मिळावे म्हणून इबा, पारदा, दमण, तापी, करबेणा आणि डहाणूका नदीवर प्रवाशांच्या सोयीसाठी बोटी ठेवल्या आहेत आणि ज्याने ह्या नद्यांच्या दोन्ही किनाऱ्यांवर आरामगृहे बांधली आहेत आणि पाण्याची सोय केली आहे, ज्याने चारकांच्या पिण्डीतावड, गोवर्धन, सुवर्णमुख आणि सोर्पारगाजवळील रामतीर्थ येथे भरणाऱ्या मेळयासाठी नानंगोतल गावात नारळांच्या ३२ झाडांची किंमत म्हणून १ हजार कार्षापण दिले आहे. त्या उसभदाताने गोवर्धन जिल्ह्याच्या तिरुन्ही (त्रिरश्मी) डोंगरावर ही लेणी आणि पाण्याचा हौद तयार केला... आणि जो सर्वभौमाच्या आज्ञेवरून वर्षाऋतूत मालयांनी अधिपति उत्तमभद्राला घेरलेल्या वेढ्यापासून सुटका करण्यासाठी गेला आणि मालयांची मुले (सैनिक) जणू काय (माझ्या सैन्याच्या) डरकाळीने घाबरून पळाली आणि त्या सर्वांना उतमभद्राच्या सैन्यातर्फे कैद करवियले. नंतर मी पुष्करसला गेलो आणि तेथे ३ हजार गायी आणि १ गाव दान दिले.

वाराह गोत्राच्या बायकोचा मुलगा अश्विभूति ह्याच्यापासून एक शेत ४ हजार (४०००) कार्षापणांनी विकत घेऊन दान दिले, ते शेत माझ्या वडलांच्या मालकीच्या गावाच्या सीमेच्या वायव्येकडे आहे. त्यापासून माझ्या लेण्यामध्ये राहणारे चतु:दिशेच्या संघाचे भिक्खू आपल्या गरजा भागवतील."

(प्रभास- सोमानाथपट्टम दसापूर - हे राजस्थानात आहे. पारदा-सुरत जिल्ह्यातील पार्डी किंवा पार नदी, बारनामा चंबळची किंवा सोन नदीला मिळणारी नदी.)

**(६) कार्ले येथील लेण्यात**

"सिद्धम ! खहरत (क्षहरत) राजा नहपानाचा जावई दीनीकाचा मुलगा उसभदात ज्याने तीन हजार गायी दिल्या, ज्याने सुवर्ण दान देऊन बानासा नदीवर विहार स्थापन केले, ज्याने देवांना आणि भिक्षुसंघाला १६ गावे दान दिली, ज्याने प्रभासच्या पवित्र तीर्थावर भिक्षुसंघाला शेती दान केले, जो आपल्या पित्यासाठी दरवर्षी १ लाख श्रमण श्रावकांना भोजन देतो, त्याने बलूरकाच्या लेणीमध्ये वर्षावास करण्याच्या चतु:दिशेच्या सर्व भिक्खू संघाला त्याच्या निर्वाहासाठी करजिक गाव दिले आहे."

(कार्ल्याची लेणी ज्या डोंगरावर आहेत त्याचे नाव वलूरक होते असे दिसते.)

नाशिकच्या लेण्यांतील ७ आणि ८ हे दोन्ही शिलालेख जवळजवळ नष्ट झाले आहेत. त्यांचे भाषांतर करणे अशक्य आहे. ते दोन्ही लेख उसभदाताचे आहेत.

(९) सिद्धम ! खहरात राजा खत्रप नहपानाचा जावई, दीनीकाचा मुलगा उसभदात याने राज्याच्या बेचाळीसाव्या वर्षी वैशाख महिन्यात त्याची लेणी चतु:दिशेच्या भिक्खू संघास दिली. शिवाय चतु:दिशेच्या भिक्खू संघाच्या चीवरांच्या आणि कुशनांच्या खर्चासाठी तीन हजार कार्षापणांची कायमची देणगी दिली आहे. हे कार्षापण गोवर्धनात राहणाऱ्या व्यापारी संघाजवळ ठेव म्हणून ठेवली आहे. विणकाम करणाऱ्यांच्या (साळयांच्या) एका व्यापारी संघाजवळ दोन हजार कार्षापण - शंभर कार्षापण प्रतिवर्ष व्याजाने आणि साळयांच्या दुसऱ्या व्यापारी संघाजवळ एक हजार कार्षापण—पंचाहत्तर कार्षापण व्याजाने ठेवले आहेत. आणि जो व्याज देतो त्याने हे कार्षापण परत करावयाचे नाहीत. शंभर कार्षापणाच्या व्याजाने जे दोन हजार कार्षापण ठेवले आहेत, त्याच्यापासून माझ्या लेण्यामध्ये वर्षावास करणाऱ्या वीस भिक्खूपैकी प्रत्येकाला चीवरांच्या खर्चासाठी वारा देण्यात यावेत. पंचाहत्तर कार्षापण व्याजाने ठेवलेल्या एक हजार कार्षापणातून कुशनांचा खर्च भागविला जाईल. आणि शिवाय कापूर जिल्ह्यातील चिखलपद्र गावी नारळाच्या झाडांची किंमत म्हणून आठ हजार कार्षापण दिले आहेत. आणि हे सर्व निगमसभेमध्ये (व्यापाऱ्यांच्या सभेत) जाहीर केले आहे. आणि रुढीप्रमाणे फलकावर लिहिले आहे. शिवाय एकेचाळीसाव्या वर्षी कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेला त्याने दान दिले आहे.

(१०) उसभदाताची बायको दक्षमित्रा हिच्या दोन देणग्या नाशिकच्या लेण्यांतील शिलालेखात वाचावयास मिळतात.

"सिद्धम ! राजा खहरात खत्रप नहपानाची मुलगी दक्षमित्रा आणि दीनीकाचा मुलगा उसभदातची बायको दक्षमित्रा हिचे धम्मदान लेण्याच्या आतील खोली दान दिली आहे."

(११) हा शिलालेख वरच्यासारखाच आहे.

(१२) नाशिक नं. (१०) (West no.15) अभीर राजाच्या ९व्या वर्षी. राजा ईश्वरसेनाच्या नवव्या वर्षी चौथ्या पक्षातील तेराव्या दिवशी, शक अग्निवर्मनची मुलगी गणापक रेबिलाची बायको आणि गणापक विश्ववर्मनची पुतणी उपासिका विष्णुदत्ता हिने सर्व प्राणिमात्रांच्या सुखासाठी आणि विशेषतः त्रिरश्मी पर्वतावर राहणाऱ्या भिक्खू संघातील आजारी भिक्खूंसाठी गोवर्धनातील बौद्ध व्यापारी संघाकडे – कुलरिकांच्या (कुंभाराच्या) संघाकडे एक हजार कार्षापण, देयुत्रिकांच्या (?) व्यापारी संघाकडे दोनशे कार्षापण, ......आणि देयूत्रिकांच्या व्यापारी संघाकडे पाचशे कार्षापण, ..... तेल्यांच्या संघाकडे २००.... ह्या कार्षापणापैकी भिक्षु संघाचे.... सर्वांचे संरक्षण व्हावे या हेतूने दान केले...."

**एलोरा (वेरूळ) येथील लेण्यांतील शिलालेख**

एलोरा येथील विश्वकर्मा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चैत्यगृहात बाल्कनीच्या वर बुद्धधम्मातील खालील प्रसिद्ध वाचन लिहिले आहे- "ये धम्मा हेतुप्पभवा I हेतु तेतां तथागतो आह I तेसं च यो निरोधी एवं वादी महासमनो ति." हा लेख विश्वकर्मा चैत्यगृहात ८व्या किंवा ९व्या शतकात लिहिला गेला असला पाहिजे.

एलोराच्या दुसऱ्या बौद्ध लेण्यात शिलालेख मिळत नाहीत. तीनताल लेण्यातील खांबावर काही अक्षरे न वाचता लोण्यासारखी कोरलेली आहेत. कदाचित लेणी पाहावयास येणाऱ्यांनी ती कोरली असावीत असे पुरावेत्ता भगवानलाल आणि जे. बर्जेस यांचे मत आहे. अक्षरांचा थाट चौदाव्या शतकातील दिसतो.

वेल्लूर किंवा एलोरा येथे एकून ३४ लेणी आहेत. त्यापैकी १ ते २९ बौद्ध आणि ३० ते ३४ नंबरची जैन लेणी (गुफा) आहेत. बौद्ध लेणी कोरण्याचे काम सर्वात पहिल्यांदा म्हणजे ई.स. ४५० च्या सुमारास सुरू झाले. ८व्या शतकातही बौद्ध लेण्यांत काही खोदकाम झाले असण्याच्या खुणा आहेत. राष्ट्रकुटांच्या कृष्णराजाने स्वत:ला शुभतुंग आणि अकालवर्ष अशी नावे धारण करून ई.स. ७५३ ते ७७५ मध्ये मराठवाड्यातील मालखेड येथून राज्य केले. त्यानेच वेरुळ येथील जगप्रसिद्ध कैलास लेणे खोदवून घेतले. त्याच्या शेजारचेच १७ नंबरचे "दशावतार" नाव असलेल्या बौद्ध लेण्याचे रुपांतर हिंदू लेण्यात केले गेले आहे. राष्ट्रकूटांच्या नंतरच्या राजांच्या काळात वेरूळ येथील जैन लेणी कोरली गेली. ह्या जैन लेण्यांतील शिल्प अत्यंत सुंदर आहे.

वेरुळ येथील बौद्ध लेणी आणि अजंठा येथील काही लेण्यांच्या खोदकामाचा काळ काही अंशी एकच असला, तरी वेरुळ आणि अजंठा येथील लेण्यांतील शिल्पात बराच फरक आहे. वेरुळ येथील लेण्यातील भिंतीवर सर्रास अनेक बौद्ध मूर्ती कोरलेल्या पाहावयास मिळतात. तसेच दारवाज्याच्या बाहेर दोन्ही बाजूस भव्य आकाराच्या बोधिसत्वाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. बोधिसत्वांच्या समवेत बहुतेक ठिकाणी शक्ती, तारा, भृकुती यांच्या आणि इतर मूर्ती कोरलेल्या आहेत.

वेरुळ येथील १० नंबरचे चैत्य लेणी "विश्वकर्मा" या नावाने प्रसिद्ध आहे. त्या लेण्याच्या मूळच्या कोरीव कामात इतका बदल केला गेला आहे की मूळ स्वरूपात ते लेण्या कश्या होत्या हे समजणे कठीण आहे. ह्या लेण्याच्या प्रवेशद्वाराच्या कमानीचे डिझाइन इतर लेण्यांमध्ये असलेल्या बोधिवृक्षाच्या पानासारखे, पण विशेष आकर्षक बनविले आहे. असे प्रवेशद्वारावरील डिझाइन भारतात इतर ठिकाणी पाहावयास मिळत नाही. वेरुळ येथील ५ नंबरचे लेणे आणि कान्हेरी येथील १० नंबरच्या लेण्यात बरेच साम्य आहे. ११ नंबर आणि १२ नंबरची लेणी तीन मजली आहेत. त्यांच्या एकंदरीत प्लॅनवरून, बाह्य दर्शनी भागातून आणि आतील प्रशस्तपणावरून हल्लीच्या महाविद्यालयाच्या इमारतीसारखाच त्यांचा उपयोग होत असावा हे अनुमान काढता येते. अजंठा, एलोरा आणि कान्हेरी येथे निश्चितपणे बौद्ध विद्यालये असली पाहिजेत.

वेरुळ येथील काही लेण्यांना धेडवाडा आणि दुसऱ्या काही लेण्यांना महारवाडा असे नाव आहे. "धेड" हा शब्द थेर ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. "धेडवाडा" आणि "महारवाडा" ही बौद्ध लेण्यांना दिलेली नावे बौद्धांच्या विषयी वाटणाऱ्या द्वेषामुळे ब्राह्मणांनी दिली नसून ती धार्मिक इतिहासातील सामाजिक स्थित्यंतराचा एक दुवा (टोपंनाव) आहेत. हल्लीचे धेड आणि महार, हे पूर्वी बौद्ध होते, ह्याचा तो एक पुरावा आहे. बौद्धांच्या पडत्या काळात ब्राह्मणांनी टाकलेल्या सामाजिक आणि आर्थिक बहिष्कारामुळे धेडांची आणि महारांची पुढे दयनीय स्थिती झाली. त्यांचे ग्रंथ नष्ट केल्यामुळे, त्यांना शिक्षण घेण्यास मनाई केल्यामुळे आणि त्यांच्यावर लादलेल्या आर्थिक गुलामगिरीमुळे, ते आपला भूतकाळ विसरले.

वेरुळच्या लेण्यांसमोरच वज्रेश्वरीचे मंदिर आहे. तेथे मूळच्या बौद्ध शाखा वज्रयानियांचा विहार आणि चैत्य असावा.

**तेर (महार) टेकडी:-** पुरा. उत्खनन ई.स. १९६८ मधे पुरावेत्ता मोरेश्वर गंगाधर दीक्षित नि सिद्ध केले कि इथे मौर्यपूर्वकालीन स्तूप होता. आत ८ आरे आणि बाहेरून १६ आरे पक्या ईटाचा चक्र सापडला. पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण द्वारावर चबुतरे निर्मित आहेत. तिथे पुलुमावी सतकर्णीचे नाणी (सिक्के) प्राप्त झाले, जे लालपूर संग्रहालयात सुरक्षित प्रदर्शनार्थ आहेत. तेर शब्द हा थेर शब्दावरून आला आहे. अंध युगात याला धेड उच्चारण प्राप्त झाले. यावरून हे सिद्ध होते कि महार लोकांचे पूर्वज बौद्ध नीतिमत्ता निर्वहक होते. त्यांचा सातवाहनाशी निकट संबंध आहे.

**संदर्भ: महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, पृ. ९६, १५१, १५२, १६९ - मा.शं. मोरे.**

## स्मॉल वंडर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज वडकी येथे २ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारी पर्यंत विज्ञान प्रदर्शनी संपन्न

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/राळेगाव :** स्मॉलवंडरहायस्कूलआणिज्युनिअरकॉलेजवडकी येथे चार दिवसीय चित्रकला,हस्तकला,विज्ञान प्रदर्शनी घेण्यात आली.सोबतच भितीचित्र स्पर्धाही घेण्यात आली,वृक्षारोपण व संवर्धन,व्यसनांचे दुष्परिणाम भारतीय संस्कृती दर्शन,राष्ट्रीय एकात्मता,प्रेरणादायी व्यक्तिमत्व,निसर्ग समतोल,मोबाईल एक व्यसन हे विषय देण्यात आले होते,किमान ३५० कलाकृती सादर करून विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.संस्थेच्या वतीने दरवर्षी समाज कार्य करणारे मान्यवरांना जीवनव्रती पुरस्कार देण्यात येतो यावर्षी सुद्धा आनंदवन वरोरा येथील समीक्षा लेखक कवी व सामाजिक कार्यकर्ते दिपक शिव यांना तसेच माजी इंडियन एअर फोर्स राजेंद्र प्रसाद सध्या सेंट्रल बँकेत वडकी कार्यरत मान्यवरांना जीवनव्रती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, सामाजिक कार्यकर्ते संजय काकडे व माजी पंचायत समिती सदस्य प्रीतीताई काकडे यांनीही प्रदर्शनाला भेट दिली व विद्यार्थ्यांचे कौतुक केले, पत्रकार कैलास कोडापे अजिंक्य भारत वृत्तपत्राचे प्रतिनिधी तसेच अमोल सांगाणी तरुण भारत वृत्तपत्राचे प्रतिनिधी यांनीही प्रदर्शनास भेट दिली केंद्रप्रमुख विशाल किनाके वडकी सर्कल अधिकारी किन्नाके व विस्तार अधिकारी वैरागडे यांनीही प्रदर्शनास भेट दिली परिसरातील शाळा व विद्यार्थी कन्या शाळा यांनी उत्साहाने प्रदर्शनाची पाहणी केली एकंदरीत ४०० कलाकृतींचे सादरीकरण करण्यात आले होते शेवटच्या दिवशी पालकांनी प्रदर्शन पाहून विद्यार्थ्यांचे अभिनंदन






केले व माजी विद्यार्थी राधिका बांगरे व प्रेरणा मोहता यांनीही प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.कलाशिक्षक पुष्पक मोहुर्ले यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले,प्राचार्य डॉ मंजुषा सागर अहमद शेख,शंकर मालखेडे विज्ञान प्रदर्शनीसाठी मार्गदर्शन करणारे नितीन गवळी,विजय फुलकर,शननो शेख,रूपाली दैवलकर,अक्षय वानखेडे सर्व शिक्षकांनी प्रदर्शनात मोलाची भूमिका पार पडली. प्राचार्यांनी सर्वांचे अभिनंदन व कौतुक करून विद्यार्थ्यांना पदके देऊन सन्मानित करून कार्यक्रमाची सांगता केली.

# बीड जिल्ह्यात “बालविवाह मुक्ती रथ अभियान”चा शुभारंभ

## आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी :** युवा ग्राम विकास मंडळ, केज व महिला व बालविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह निर्मूलनाच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या “बालविवाह मुक्ती रथ अभियान”ची अधिकृत सुरुवात दि. 26 जानेवारी 2026 रोजी करण्यात आली.

या अभियानाचे उद्घाटन आज मा. आमदार नमिता ताई मुंदडा यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी प्रमुख उपस्थितीत मा. श्री. नागरगोजे (गट विकास अधिकारी, केज), युवा ग्राम विकास मंडळ केजचे कार्यकारी सचिव मा. एच. पी. देशमुख, कार्यवाहक संतोष रेपे, समन्वयक प्रकाश काळे, अस्मिता इंगळे, संभाजी वळसे, अंजली जगदेव, राजकुमारी




किरदंत, जयेश चव्हाण, कदम, आर्यन नायकवाडे, रितेश रेपे, ज्ञानेश्वर रेपे तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

या बालविवाह मुक्ती रथ अभियानाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात फिरून बालविवाह प्रतिबंधाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. यामध्ये बालविवाह प्रतिबंध कायदा 2006 संदर्भातील माहिती, तक्रार नोंदविण्यासाठी उपलब्ध असलेल्या हेल्पलाईन सेवा, संरक्षण यंत्रणा व प्रशासकीय कार्यपद्धती याविषयी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

पुढील काही आठवड्यांपर्यंत हा रथ जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामपंचायतींमध्ये फिरणार असून, बालविवाह रोखण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मान्यवरांनी केले.

यानंतर हा रथ अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नेण्यात आला. तेथे प्राचार्य पी. के. जाधव व वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुजाता काळम पाटील यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पुढे हा रथ वेणूताई चव्हाण कन्या माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई येथे नेऊन तेथील बालिकांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्राचार्य मा. सुजाता कदम मॅडम व त्यांचा संपूर्ण कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

हा रथ पुढील काळात विविध शाळा व महाविद्यालयांना भेटी देत सामाजिक संस्थांना एकत्र घेऊन व्यापक जनजागृती करणार आहे. ग्रामीण विकास मंडळाचे अध्यक्ष मा. सय्यद एस. बी. यांनीही रथावर स्वाक्षरी करून या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी युवा ग्राम विकास मंडळ “जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रन” या देशव्यापी बालहक्क अलायन्ससोबत कार्यरत आहे. जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता असलेल्या बालिकांच्या घरी जाऊन पालक व बालिकांना बालविवाहाचे दुष्परिणाम व कायदेशीर बाबी समजावून सांगण्यात येत असून, बालविवाह न करण्याबाबत शपथपत्र भरून घेतले जात आहे.एप्रिल 2025 पासून आजपर्यंत युवा ग्राम विकास मंडळाने एकूण 390 शपथपत्रे भरून घेतली असून, हे कार्य पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. अशी माहिती युवा ग्राम विकास मंडळ कार्यवाहक संतोष रेपे यांनी दिली.

## पोखरा अंतर्गत विविध योजनांची जोड आवश्यक - जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव वाडी नागपूर :** पोखरा योजने अंतर्गत शेतकऱ्यांच्या उन्नतीसह जिल्ह्यातील लहान मोठ्या तलावांची उपलब्धी लक्षात घेवून मत्स्यव्यवसायाचाही यात सहभाग घेणे आवश्यक आहे. शेती-शेतकरी यांच्या विकासासाठी शासनाच्या सर्व विभागांचे कृतिशील योगदान मिळाल्यास जिल्ह्यातील विकासाचे लक्ष्य कालमर्यादेत पूर्ण करता येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना अंतर्गत प्रधानमंत्री धरती आबा योजनेच्या जिल्हा सनियंत्रण



समितीची प्रथम बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.या बैठकीला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर, सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय शुभम कोमरेवार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक , प्राध्यापक, मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे प्रतिनिधी, दोन अशासकीय सदस्य, तसेच मत्स्य विकास अधिकारी व सहायक मत्स्य विकास अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रधानमंत्री धरती आबा योजनेअंर्गत प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्राप्त प्रस्तावांची शासनाकडे शिफारस करण्याबाबत समितीने सकारात्मक निर्णय घेण्यात आले. गेल्या पाच वर्षांपासून राबविल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेचा कालावधी मार्चमध्ये समाप्त होत आहे. त्याअनुषंगाने योजनेचा संपूर्ण अहवाल, आर्थिक दायित्व आणि जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती पीपीटीद्वारे सादर करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकल्पांच्या प्रगतीवर समाधान व्यक्त केले.

जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वी काही प्रकल्पांना भेटी दिल्या असून, भविष्यात उर्वरित उत्कृष्ट प्रकल्पांना भेट देण्याचे नियोजन केले आहे. त्याबाबतचे वेळापत्रक मत्स्य विभागातर्फे सादर करण्यात आले. जिल्ह्यातील 60 शेततळ्यांसाठी प्रस्तावित असलेल्या मत्स्यव्यवसाय योजनेचा आढावा घेण्यात आला. तसेच, 'पोखरा' (Po-CRA) योजनेअंतर्गत मत्स्यव्यवसाय वाढवण्यासाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांना 'विशेष निमंत्रित सदस्य' म्हणून समाविष्ट करण्याचे निर्देश जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना देण्यात आले.

## महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ बस स्टॉप ची जागा अतिक्रमणाच्या विळख्यात




**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा -तालुक्यातील-पहेला येथील बस स्टॉप अतिक्रमणाच्या विळख्यात असून प्रवासी व विद्यार्थी यांना रस्त्यावर उभे राहून एस टी महामंडळाच्या बसची तास न तास वाट पाहावी लागते . प्रवासी व विद्यार्थी यांना उन्हाचा चटका बसतो या गावाचा परिसरातील 25 ते 30 गावाचा संपर्क येतो. परंतु सदर गावात बस स्टॉप नाही .यापेक्षा दुर्दैव कोणते ?सदर क्षेत्रातील बस स्टॉप ची जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या नावाने ५४.२० क्षेत्र चौरस मीटर असून ४२८ पहेला उपअधीक्षक भूमि अभिलेख भंडारा यांच्या कार्यालयात तशी नोंदणी आहे . महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ यांनी याबाबत त्वरित कारवाई करून सदर जागा मोकळी करून त्या ठिकाणी प्रवाशांकरता व विद्यार्थ्यांकरता बस स्टॉप तात्काळ बनविण्यात यावे अशी परिसरातील सर्व जनतेची मागणी आहे.

## जरीपटका येथील खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला गुन्हे शाखेकडून अटक

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** जरीपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या खुनाच्या गुन्ह्यातील एका फरार आरोपीला अटक करण्यात नागपूर गुन्हे शाखेच्या युनिट ५ ला यश आले आहे. आशिष उर्फ बॉन्ड्या यादवराव चौधरी (वय ४२ वर्षे, रा. गौतम नगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

**नेमकी घटना काय?**

जानेवारी २०२६ मध्ये जरीपटका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा (कलम १०९, भा.न्या.सं.) दाखल झाला होता. या गुन्ह्यापासून आरोपी आशिष उर्फ बॉन्ड्या फरार होता. पोलीस त्याचा शोध घेत होते.

**अशी झाली अटक**

४ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हे शाखा युनिट ५ चे पथक पेट्रोलिंगवर असताना पोलीस हवालदार नजीर शेख यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, हा आरोपी सीताबर्डी भागातील मिठानीम दरगा परिसरात येणार आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

सखोल चौकशी केली असता त्याने गुन्ह्यात आपला सहभाग असल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीची वैद्यकीय तपासणी पूर्ण करून त्याला पुढील कारवाईसाठी जरीपटका पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

**यांनी केली कारवाई**

ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त डॉ. राहुल माकणीकर आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अभिजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

यात गुन्हे शाखा युनिट ५ चे पोलीस निरीक्षक विनायक गोल्हे, सपोनि गणेश कदम, विजय गिते आणि त्यांच्या पथकातील कर्मचारी राजूसिंग राठोड, राजेंद्र टाकळीकर, नजीर शेख, मुकेश राऊत व इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

## मुलांनी आपले लक्ष सरकारी नोकरी कडे ठेवावे - प्रा.डॉ.जयपाल पाटील

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी. भोईरअलिबाग:-** इयत्ता १० वीचे पेपर सोडवतानां प्रश्न पत्रीका वाचुन आपल्याला सोपे वाटतात ते प्रथम सोडवण्यास घ्यावे त्या साठी घाई न करता उत्तर पत्रिका सुवाच्य अक्षरात लिहावी मग आठवण करून आपणास जे जड वाटतात त्याकडे वळावे त्यामुळेच आपण हमखास पास होऊच ही मनात भावना ठेवून पुढे शासनाच्या नोकऱ्या कश्या मिळतील याकडे लक्ष ठेवावे असे आवाहन आय.ई.एस.वरसोली च्या १० वीच्या विद्यार्थीचा निरोप समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले.

प्रारंभी गणेश पुजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.पाहुण्यांचा परिचय श्री. गुरवसर यांनी करुन दिला. व्यासपीठावर इंग्रजी



माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ.पुजा पाटील, मराठी माध्यमाच्या सौ.काटे आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळेस शाळेतर्फे रायगड भूषण प्रा.डॉ.जयपाल पाटील यांना पुष्पगुच्छ व भेट देऊन सन्मान केला.यानंतर डॉ.जयपाल पाटील यांनी मुला मुलीनां आरोग्य खात्यात परिचारीका, कृषी कोलेज मधे डिप्लोमा अगर पदवीधर होउन कृषी सहायक अथवा ग्रामसेवक, परदेशी भाषा शिकून दुतावासात भाषांतराची नोकरी,हवाई प्रवासात नोकरी,आपल्या गुरुजनांचा वारसा शिक्षकी पेशा, पब्लिक सवींस मधे अधिकारी म्हणजेच तहसीलदार, गटविकास अधिकारी,पोलीस अधीक्षक, अधिकारी होता येते याची माहीती दिली. त्याच बरोबर मुलींना आपल्या ओठांवर लावत असलेल्या लिए स्टिक बद्दल माहिती देऊन आरोग्य आपत्ती कशी येते यासाठी कायम महागडी दर्जेदार मान्यता प्राप्त कंपनीची वापरण्याचा मोलाचा सल्ला दिला. यावेळी विद्यार्थी मधुन कु.आर्य राउत,कुमारी दिया पाटील, निधी जायनाखवा, आरोही पाटील, जिमी बेडे,प्रतिज्ञा जाधव,अनुष्का गावडे,नंदिनी मेहता यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## सेवानिवृत्तीनंतरही समाजजागृतीचा अखंड दीप तेवत ठेवणारे - जगताप माऊली महाराज

आयुष्यभर शिक्षक म्हणून ज्ञानदान केल्यानंतर अनेकांच्या मनात “आता पुढे काय?” हा प्रश्न उभा राहतो. मात्र टाकळसिंग येथील रहिवासी ज्ञानदेव जगताप माऊली महाराज यांनी या टप्प्यावर अध्यात्माचा मार्ग स्वीकारत समाजसेवेचा नवा अध्याय सुरू केला—आणि सेवानिवृत्तीला नवी दिशा दिली.

२६ जून १९६३ रोजी टाकळसिंग येथे जन्मलेले महाराज लहानपणापासूनच हरिपाठ, पोथी व कथा–कीर्तनाच्या संस्कारात वाढले. गावात नियमित होणाऱ्या हरिपाठाला जाणे, घरी पोथी ऐकणे, संतकथा समजून घेणे—या साऱ्या गोष्टी त्यांच्या बालमनात भक्तीची बीजे पेरणाऱ्या ठरल्या. वडिलांकडून लाभलेला हा अध्यात्मिक वारसा पुढे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनला.

शिक्षणक्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी शेतकरी शिक्षण संस्थामध्ये तब्बल ३१ वर्षे इंग्रजी विषयाचे अध्यापन केले. शिक्षक म्हणून शेकडो विद्यार्थ्यांना घडवताना त्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता जीवनमूल्यांची शिकवण दिली. शिस्त, प्रामाणिकपणा, परिश्रम आणि संस्कार यांवर त्यांनी नेहमीच भर दिला. शिक्षक म्हणून कर्तव्य बजावत असतानाच अध्यात्मिक साधनेची ज्योत त्यांनी अखंड तेवत ठेवली.

हरिभक्त परायण, वैकुंठवासी कीर्तनकेसरी महादेव महाराज जगताप यांना गुरू मानून त्यांच्या सानिध्यात त्यांनी अनेकदा पंढरपूर व पैठण येथील वाऱ्या केल्या. या वारींच्या प्रवासात संतवाणी,



अभंग, नामस्मरण आणि भक्तीचा गोड अनुभव त्यांच्या आयुष्याला नवे वळण देणारा ठरला. याच साधनेतून त्यांची प्रवचन–कीर्तनाची वाट अधिक दृढ झाली.

१९८९ साली कर्जत तालुक्यातील गायकर वस्ती येथे पहिले प्रवचन देऊन सुरू झालेला हा अध्यात्मिक प्रवास आजतागायत अखंड सुरू आहे. आतापर्यंत त्यांनी सुमारे ४०० ते साडेचारशे प्रवचने तसेच १०० ते १५० कीर्तने सादर केली आहेत. त्यांच्या ओघवत्या वाणीतील विचार, संतवाणीची जोड, तसेच दैनंदिन जीवनाशी निगडित उदाहरणांमुळे श्रोते सहजपणे त्यांच्याशी जोडले जातात. त्यामुळे विविध गावांतून भाविक मोठ्या संख्येने त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहतात.

जगताप महाराज माऊली यांनी अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांमध्ये रामायण महाभारताच्या कथा सांगून मूल्य रुजवण्याचे काम केले.

सध्या आष्टी येथील ज्ञानाई तुकाई गुरुकुलमध्ये ह.प. भागवताचार्य आदिनाथ महाराज दानवे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली ते आध्यात्मिक अध्ययन–अध्यापन करत आहेत. संतचरित्र, कथा, कीर्तन व प्रवचन या माध्यमांतून समाजातील व्यसनमुक्ती, सदाचार, संस्कार, कुटुंबमूल्ये आणि सामाजिक सलोखा यांसारख्या विषयांवर ते प्रभावी व परखड मार्गदर्शन करतात. समाजातील वाईट प्रवृत्तींवर ठामपणे बोट ठेवत लोकांना सन्मार्ग दाखवण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.

त्यांच्या प्रवचनांतून युवकांना योग्य दिशा मिळत असून, जीवनात सकारात्मक बदल घडताना दिसत आहेत. अनेक युवक व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प करतात, तर ज्येष्ठांना मानसिक समाधान व आत्मिक शांतता लाभते. कुटुंबातील नातेसंबंध दृढ व्हावेत, समाजात सलोखा टिकावा आणि प्रत्येकाने सदाचाराचा मार्ग स्वीकारावा—हा संदेश ते सातत्याने देत असतात.

सेवानिवृत्तीनंतरही निष्क्रिय न राहता समाजासाठी सक्रिय राहता येते, हे जगताप माऊली महाराजांनी आपल्या कृतीतून ठासून दिले आहे. आज अनेक सेवानिवृत्त शिक्षकांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत. अध्यात्म आणि समाजप्रबोधन यांची सुंदर सांगड घालत त्यांनी आयुष्याच्या उत्तरार्धालाही अर्थपूर्ण बनवले असून, “सेवा हीच साधना” हा मंत्र प्रत्यक्ष कृतीत उतरवून दाखवला आहे.

**शब्दांकन : महादेव आमले, अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड**

## श्रीमती यशोदाबाई जोगी विद्यालय दहेली येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**श्री क्षेत्र माहूरगड/प्रतिनिधी सय्यद इसा :** दरवर्षी प्रमाणे यंदाही श्रीमती यशोदाबाई जोगी विद्यालय दहेली येथे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले.येथे विद्यार्थांची विविध कला गुण दर्शन, डान्स, एकांकिका, विविध स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशाळेचे मुख्याध्यापक श्री पहूरकर मधुसूदन दिगंबराव हे होते.उदघाटक व प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ नागरिक श्री श्रीनिवासजी जाधव पाटिल, माजी गटशिक्षणाधिकारी श्री रविंद्रजी जाधव सर, श्री बजरंगजी वाडगुरे सर्कल प्रमुख, दिलीपभाऊ भोसले, माजी मु.अ.श्री बोंतावार आनंदराव सर, प्राचार्य संगीता देवी महाविद्यालय दहेली तांडा श्री आडे सर, प्रा.मुडे सर,जि.प.मु.अ.दहेली श्री बि.डी.जाधव सर व मारोती गुरनुले व विशेष अतिथी म्हणून प्रत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेशभाऊ कचकलवार यांची उपस्थिती होती. मान्यवरांचे स्वागत करण्यात आले व प्रस्तावित श्री सतिश राऊत सर यांनी केले. विद्यार्थ्यांनी विविध नृत्य,कला अस्विकार दाखवत श्रोत्यांना खिळवून ठेवले.श्रोत्यांनी आपल्या मुला मुलींना भरपुर बक्षीस देऊन आनंद द्विगुणित केला. विशेष मार्गदर्शन श्री रविंद्र जाधव सर यांनी केले तर सुत्र संचालन श्री हुडेकर सर,व विद्यार्थीनींनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री मोरे सर, श्री कल्याणी सर, राऊत सर,वाडकर सर,शेंदलवार सर,मोकासवाड सर, ऋषिकेश पहूरकर, तानाजी गुरणूले सर यांनी परीश्रम घेतले.व आभार मु.अ.श्री पहूरकर एम.डी.सर यांनी मानले, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील भीषण वाहतूक कोंडी तब्बल 34 तासांनंतर अखेर पुर्ववत प्रवाशांचे खाण्यापिण्याचे हाल मदतीसाठी खालापूर प्रशासनाचा हात

**दैनिक युवक आधार**

**खालापूर -संतोष शेवाळे :** मंगळवारी ३ तारखेला संध्याकाळी ५वाजता मुंबई-पुणे एक्सप्रेसवे वर आडोशी बोगद्या जवळ मुंबई कडे जाणाऱ्या मार्गावर कॅमीकल ने भरलेला टॅंकर बोगद्या अगोदर तीव्र उतार वर एक वळणावर उलटला व गॅसची गळती झाली व वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात दोन्हि बाजुने झाली.वाहन चालक,प्रवाशी ज्या मधे महिला,लहान मुले, वृद्ध,अपंग, आजारी व्यक्ती अश्या सर्वच प्रवाशांना वाहतूक कोंडी मधे ३४ तास अडकुन पडले व प्रचंड हाल व मनस्ताप सहन करावा लागला.

पिंपरी चिंचवड ते नवीमुंबई पर्यंत असणाऱ्या एखाद्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी ने का नाही येऊन कार्यकर्त्यां सोबत अडकलेल्या प्रवाश्यासाठी मदत कार्य केले....??

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, व मंत्र्याच्या प्रवासासाठी शासन खर्च करते व सामान्य लोकांना का रस्त्यावर अन्न पाण्याविना का सोडण्यात आले. तेव्हा का नाही वापरले हेलिकॉप्टर किव्वा अन्य जलद पर्याय...??

सगळे राजकारणी जिल्हा परिषद प्रचारात व्यस्त. कोणाला वेळ आहे सामान्य लोकसाठी...जर एखादा राजकीय मेळावा असता किव्वा पंतप्रधान दौरा असता तर राजकीय पक्षानी व शासनाने लाखो लोकांच्या खाण्या पिण्याची सोय केली असती मग या, 32 तासात कुठे गेली माणुसकी...??

मावळ भागात पोलिसांनी अन्न धान्य साहित्यवाटप केले, 18 तासा



नंतर खालापूर तहसील कार्यालया मार्फत प्रवाशांना पाणी व अन्न वाटप केले, (अनेकांना सोय झाली) पण ते सर्वानाच दिलासा देईल असे पुरेसे न्हवते....

ADG ट्रॅफिक प्रवीण साळुंखे, पोलीस प्रशासनाचे आय जी संजय दराडे साहेब, रायगड पोलीस SP आचल दलाल, महामार्ग सुरक्षा पथक SP तानाजी चिखले साहेब, खालापूर dysp डॉ नेहूल व टीम, प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण, पनवेल व RTO निरीक्षक दिलीप दराडे व टीम. ट्रॅफिक dysp दिघे मॅडम, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण महसूल टीम, खाजगी कंपन्या चे फायर टेंडर, केमिकल एक्स्पर्ट, IRB यंत्रणा सोबत हेल्प फॉउंडेशन ई. रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण होईपर्यंत स्पॉट वरती सर्व वरिष्ठ अधिकारी ठाण मांडून होते तर त्यांच्या टीम आपत्कालीन मदत कार्यात गळती रोखण्यासाठी व वाहतूक नियोजना मध्ये व्यस्त होते.

सर्वच मेन स्ट्रीम मीडिया, पत्रकारांनी प्रवश्यांचे हाल दाखवले तरीही रायगड जिल्हा प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन, पूणे जिल्हा प्रशासन व आपत्ती व्यवस्थापनाने, संबंधित क्षेत्रातील लोकप्रतिनिधी नी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून अडकलेल्या प्रवश्यासाठी फूड पॅकेट, पाणी ई. ची व्यवस्था करायला पाहिजे होती,

प्रवाश्यांचे मात्र उपाशी पोटी खूप हाल झाले.

## अनमाळ येथे अवैध रेती चोरी करणाऱ्या वाहतुकी ट्रॅक्टर वर कारवाई

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/सय्यद इसा :** माहूर अनमाळ परिसरात अवैध रेती वाहतुकीवर तहसील प्रशासनाने मोठी कारवाई करत दोन ट्रॅक्टर जप्त केले आहेत. ही कारवाई तहसीलदार यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार व त्यांच्या चमुने करीत दोन ट्रॅक्टर जप्त करीत तहसील कार्यालय परीसरात जमा करण्यात आले आहेत.

दिनांक 2 फेब्रुवारी रोजी आनमाळ परीसरात बेकायदेशीरपणे रेती उत्खनन करून वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती तहसील प्रशासनाला मिळताच तहसीलदार अभिजित जगताप यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार कैलास जेठे, तलाठी चंद्रकांत बाबर, यादव यांच्यासह त्या गावचे कोतवाल, पोलिस पाटील



यांनी घटनास्थळी पोहचुन दोन ट्रॅक्टर ताब्यात घेतले. त्यावेळी परीस्थिती गंभीर होण्याचे संकेत पथक प्रमुख कैलास जेठे यांना मिळाल्याने त्यांनी पोलिसांना पाचारण करीत जप्त केलेले दोन ट्रॅक्टर पोलिस संरक्षणात तहसील कार्यालय येथे जमा करण्यात आले, गौण खनिज अधिनियमानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पथक प्रमुख कैलास जेठे यांनी दिली आहे

## शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार विलास फडके, मारुती भस्मा यांच्या बाईक रॅलीला प्रचंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या महाविकास आघाडीचे नेरे जिल्हा परिषद मतदार संघाचे उमेदवार मारुती बाळू भस्मा आणि आदई पंचायत समिती गणाचे उमेदवार विलास नारायण फडके यांच्या बाईक रॅलीला 5 फेब्रुवारी रोजी उदंड प्रतिसाद मिळाला. या बाईक रॅलीत मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, नेते सहभागी झाले होते. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, जिल्हाचिटणीस प्रकाश म्हात्रे, नामदेवशेठ फडके, ठाकरे गटाचे विश्वास पेटकर यांच्यासह अनेकांनी सहभाग



घेतला.

या बाईक रॅलीत मारुती भस्मा आगे बढो, विलास फडके आगे बढो या घोषणांनी परिसर दणाणून गेला. नेवाळी येथून सुरू झालेली महाविकास आघाडीची ही रॅली पुढे आदई, केवाळे, भोकरपाडा, चिपळे, बोनशेत, कोप्रोली, विहीघर या ठिकाणी मार्गस्थ झाली. महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन या बाईक रॅलीत करण्यात आले. विलास फडके आणि मारुती भस्मा हे निवडणूक रिंगणात उतरले असून त्यांना सकारात्मक वातावरण असल्याचे चित्र दिसत आहे. रॅली दरम्यान घोषणाबाजी करत नागरिकांशी थेट संवाद साधत शेकाप महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले. या रॅलीला तरुण वर्गासह जेष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यामुळे परिसरात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. 7 फेब्रुवारी होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार प्रचंड मतांनी विजयी होतील असे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले.

## पनवेल पिल्लई युनिव्हरसिटी मद्धे अग अग सुनबाई काय म्हणता सासूबाई चित्रपटाची टीम विध्यार्थ्यांनच्या भेटीला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** अलेग्रिया निमित्त पनवेल पिल्लई युनिव्हरसिटी पनवेल येथे गुरुवारी मराठी चित्रपट "अग अग सुनबाई काय म्हणता सासूबाई " चित्रपटाची टीम विध्यार्थ्यांनच्या भेटीला आली होती. "अग अग सुनबाई काय म्हणता सासूबाई" प्रमोशनचा देखणा सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला चित्रपटाचे मुख्य कलाकार प्रार्थना बहिरे,दिग्दर्शक केदार शिंदे आणि निर्मिती सना शिंदे या वेळी उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी कलाकारांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

दिग्दर्शक केदार शिंदेने सासू-सुनेच्या या कथेला भावनिक किनार उत्तम दिली आहे. सासू आणि सुनेचे वेगवेगळे पैलू मांडताना त्यांच्यातील नात्याला





कुठे तडा जाणार नाही, याची काळजी घेतली आहे. त्यांच्या नात्यातील रुसवे-फुगवे, त्यांच्यातील चढाओढ आणि टोमणे तसेच त्यांच्यातील शाब्दिक संघर्ष मांडताना त्या नात्यातील भावभावना आणि गोडवा जपण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. निर्मिती सावंत, प्रार्थना बेहरे, राजन भिसे, नकुल घाणेकर आदी कलाकारांनी या कथानकाला आपल्या उत्तम अभिनयाची छान जोड दिली आहे. विशेष म्हणजे, निर्मिती सावंत आणि प्रार्थना बेहरे यांनी आपापल्या व्यक्तिरेखा अत्यंत प्रभावीपणे साकारल्या आहेत. संपूर्ण चित्रपट त्यांनी आपल्याच खांद्यावर घेतला आहे. सासू आणि सुनेतील रुसवे-फुगवे, एकमेकींमधील चढाओढ आणि संघर्ष तसेच भावभावना व हळवे प्रेम त्यांनी सुंदररीत्या सादर केले आहेत.चित्रपट या आधीच सिनेमागृहात हाऊसफुल सुरु असून प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.या वेळी कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर कलाकारांनी आपल्या चित्रपटाविषयी अनुभव मांडले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कलाकारांनी त्यांच्या कॉलेज जीवनातील आठवणी शेअर केल्या आणि प्रेक्षकांना नक्कीच हा चित्रपट आवडेल असा विश्वास व्यक्त केला.कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चित्रपटातील गाण्यांवर प्रार्थना बेहरे सह ठेका धरत वातावरण प्रफुलीत केलं. या वेळी पिल्लई महाविद्यालयाच्या संचालक - पीआर, पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, डॉ. निवेदिता श्रेयन्स, डॉ. संदीप जोशी, प्राचार्य, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय डॉ. गजानन वाडेर, प्राचार्य, पिल्लई कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय प्राचार्य संदीप जोशी, प्राध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## हरभऱ्यावरील घाटेअळीचे तात्काळ व्यवस्थापन करा; तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** तालुक्यातील हरभऱ्याचे पिक बहुतांश ठिकाणी फुलोरा व घाटे भरण्याच्या अवस्थेत आहे. या दरम्यान या पिकावर घाटे अळीच्या प्रादुर्भावाची शक्यता आहे. घाटेअळी ही हरभरा पिकाची प्रमुख किड असुन या किडींची मादी पतंग पानावर, कोवळया शेंडयावर, कळयांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. ही अंडी खसखसीच्या दाण्यासारखी दिसतात. त्यातून २ ते ३ दिवसात अळी बाहेर पडते. ही अळी पानावरील हरीत द्रव्य खरडून खाते. त्यामुळे पाने प्रथम पिवळसर पांढरी होऊन वाळतात व गळून पडतात. थोडया मोठ्या झालेल्या अळया संपूर्ण पाने व कोवळी देठे खाऊन फस्त करतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी तात्काळ त्यावर उपाययोजना करा असे आवाहन मालेगाव तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी केले





आहे.

हरभरा पिक फुलो-यावर आल्यावर हया अळीचा प्रादुर्भाव वाढतो व अळया प्रामुख्याने फुले व घाटयांचे नुकसान करतात. मोठ्या झालेल्या अळया घाटयाला छिद्र करून आतील दाणे खाऊन घाटे

पोखरतात. एक अळी साधारणतः ३० ४० घाटयांचे नुकसान करते. त्यासाठी शेतकऱ्यांनी एकात्मिक व्यवस्थापना मध्ये पक्षी थांबे घाटेअळीचे परभक्षक उदा. बगळे, मैना, राघो, निळकंठ, काळी चिमणी ईत्यादी पिकामधे फिरून घाटे अळया वेचून त्यांचे पिकावरील नियंत्रण करतात. अवाजवी किटकनाशकाची फवारणी केल्यास पक्षी किटकनाशकांच्या वासामुळे शेतामधे येणार नाहीत. त्यामुळे किटकनाशकाचा जास्त वापर टाळावा. ज्या शेतामधे मका किंवा ज्वारीचा नैसर्गिक पक्षी थांबे म्हणुन उपयोग केला नसेल त्या शेतामधे बांबुचे त्रिकोणी पक्षी थांबे प्रती हेक्टर २० पक्षी थांबे तयार करून शेतामधे लावावे. त्यामुळे पक्षांचे अळया वेचण्याचे काम सोपे होते.

कामगंध सापळयाचा वापर करावा. यासाठी घाटे अळीचे कामगंध सापळे हेक्झाल्युर एकरी दोन किंवा हेक्टरी पाच सापळे याप्रमाणे लावावेत. सापळयामधे सतत तीन दिवस आठ ते दहा पंतम आढळल्यास (१०० किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचे निरीक्षण करून किडींचा बंदोबस्त करण्यासाठी पहिली फवारणी ५० टक्के फुलोरावर असतांना निंबोळी अर्क ५ टक्के किंवा एच.ए. एन. पि. व्हि पिओबी/मिली) ५०० एल.ई. है. किंवा क्विनॉलफॉस २५ ई. सी., २० मि.ली. दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १५ दिसानंतर ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मिली किंवा इमामेक्टीन बेझोएट ५ टक्के एस जी ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७० टक्के एससी ९ मिली किंवा क्लोरॅन्ट्रानीलीप्रोल १८.५ एससी ३ मिली किंवा इंडोक्झाकार्ब १५.८० इसी ६.६ मिली किंवा लॅबडा सायहेलोथ्रीन ०.५ इसी १० मिली वरील पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वरील किटकनाशकांची मात्रा ही साध्या पंपासाठी असुन, पावरस्प्रे साठी मात्रा तिप्पट करावी असे ही आवाहन तालुका कृषी अधिकारी मालेगाव कैलास देवकर यांनी केले आहे.

## स्वार्थी राजकारणामुळेच विवेक पाटील तुरुंगात – माजी सभागृहनेते परेश ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनतेचा विकास करण्यापेक्षा केवळ स्वतःचा स्वार्थ जपण्याचे राजकारण केल्यामुळेच माजी आमदार विवेक पाटील यांना आज तुरुंगात शिक्षा भोगावी लागत आहे, अशी घणाघाती टीका माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केली आहे. भारतीय जनता पार्टीने नेहमीच विकासाला प्राधान्य दिले असून पक्षाच्या नेतृत्वावर जनतेचा गाढा विश्वास आहे. त्यामुळे विकासाचा हा रथ अविरत सुरू ठेवण्यासाठी उरणमधील भाजप-महायुतीच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन त्यांनी आढावा बैठकीत केले.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून उरण तालुक्यात महायुतीच्या उमेदवारांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. याच प्रचाराचा भाग म्हणून चिरनेर जिल्हा परिषद गटाचे उमेदवार देवेंद्र पाटील, चिरनेर पंचायत समिती गणाच्या उमेदवार साक्षी पाटील आणि आवरे पंचायत समिती गणाच्या उमेदवार



समीधा म्हात्रे यांच्या प्रचारार्थ वशेणी, पिरकोन, सारडे आणि आवरे या गावांमध्ये बुधवारी बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीदरम्यान सारडे गावातील विश्वनाथ माळी यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला, त्यांचे परेश ठाकूर यांनी पक्षात स्वागत केले. या बैठकीवेळी माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, पिरकोनचे माजी सरपंच के. वाय. गावंड, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, तालुका अध्यक्ष मुकेश म्हात्रे यांच्यासह वशेणीचे माजी सरपंच विजय म्हात्रे, रतक्र्याकर गावंड, सारड्याचे सरपंच रोशन पाटील, आवऱ्याचे माजी सरपंच भार्गव गावंड आणि महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा राणी म्हात्रे यांच्यासह आजी-माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिक्षकांच्या न्याय्य हक्कासाठी 'हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन'चे पाऊल!

### मंत्रालयात शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांचा सत्कार व विविध मागण्यांचे निवेदन सादर!

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तसेच महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनच्या वतीने शेख अब्दुल रहीम सर यांनी नुकतीच शालेय शिक्षण राज्यमंत्री ना. डॉ. पंकज राजेश भोयर यांची मंत्रालय, मुंबई येथे भेट घेण्यात आली. यावेळी फाउंडेशनच्या वतीने मंत्र्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे तर्फे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी परंपरेनुसार पुस्तक(डायरी) आणि शाल देऊन सत्कार केला. शिक्षकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

**निवेदनातील प्रमुख मागण्या:**

BLO कामातून मुक्ती: शिक्षकांना अशैक्षणिक कामातून (विशेषतः BLO) कायमस्वरूपी कार्यमुक्त करावे, जेणेकरून त्यांना पूर्ण वेळ अध्यापनाकडे देता येईल. शिक्षण मंत्री दादा भुसे यांचे राज्यातील हजारो शिक्षक बांधवातर्फे आभारही व्यक्त करण्यात आलें.

शिक्षण सेवक कालावधी रद्द करणे: नवीन शिक्षकांसाठी असलेला जाचक शिक्षण सेवक कालावधी रद्द करून त्यांना पहिल्या दिवसापासून पूर्ण वेतन श्रेणी लागू करावी.

आश्वासित प्रगती योजना: इतर शासकीय



कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांनाही १०, २० आणि ३० वर्षांच्या सेवेनंतर सुधारित वेतन लाभाची 'आश्वासित प्रगती योजना' लागू करावी.

TET अटीत शिथिलता: जे शिक्षक आधीपासूनच सेवेत रुजू आहेत, त्यांच्यासाठी TET परीक्षेची अनिवार्यता शिथिल करून त्यांना दिलासा द्यावा.

कॅशलेस वैद्यकीय सुविधा: शिक्षकांना आणि त्यांच्या कुटुंबाला गंभीर आजारांच्या उपचारासाठी इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे 'कॅशलेस हेल्थ कार्ड'ची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

केंद्राप्रमाणे महागाई भत्ता व थकबाकी: केंद्र सरकारने घोषित केल्याप्रमाणे वाढीव महागाई भत्ता आणि त्याच्या थकबाकीची रक्कम शिक्षकांना विनाविलंब मिळावी.यावेळी राज्यमंत्र्यांनी या मागण्यांवर प्रत्येक सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. शिक्षकांच्या हक्कासाठी लढणाऱ्या हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे तसेच शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांना निवेदनाची एक प्रत देण्यात आली आहे...

# अर्थसंकल्प २०२६-२७ : मजबूत आरोग्य व्यवस्था उभारण्याकडे भारताची वाटचाल

काल संसदेत देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ सादर करण्यात आला. हा भारताचा ८० वा वार्षिक पूर्ण अर्थसंकल्प असून तो अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडला. त्यांनी सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम केला आहे. विशेष म्हणजे, भारताच्या इतिहासात प्रथमच रविवारी अर्थसंकल्प सादर झाला. यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी ज्या प्रकारे उत्पन्न-सुरक्षा, उत्पादनवाढ, कृषी पायाभूत सुविधा आणि नव्या शेती पद्धतींवर भर देण्यात आला आहे, त्याच व्यापक विकासदृष्टीतून आरोग्य क्षेत्रालाही केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. संसदेत सादर झालेल्या आकडेवारीचा आणि मागील दोन आर्थिक वर्षांतील खर्चाशी केलेल्या तुलनेचा आधार घेऊन, यंदाच्या अर्थसंकल्पातील आरोग्य क्षेत्राचा संभाव्य परिणाम येथे सोप्या शब्दांत मांडण्यात येत आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात 'केंद्रीय क्षेत्रातील आरोग्य योजना' व प्रकल्पांसाठी २०२६–२७ मध्ये ८,४००.७ कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. याच घटकासाठी २०२४–२५ मध्ये प्रत्यक्ष खर्च ५,४३७.१९ कोटी रुपये होता, तर २०२५–२६ मध्ये सुधारित खर्च ६,०९३.६५ कोटी रुपये इतका होता. म्हणजेच दोन वर्षांत या घटकातील तरतूद सुमारे २,९६३ कोटी रुपयांनी वाढली आहे. या निधीतून प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना, राष्ट्रीय एड्स व लैंगिक रोग नियंत्रण कार्यक्रम आणि प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान या महत्त्वाच्या योजना राबविल्या जातात.

'प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेचा' मुख्य उद्देश देशातील विविध भागांमध्ये उपलब्ध असलेल्या तृतीयस्तरीय आरोग्य सेवांमधील प्रादेशिक तफावत कमी करणे हा आहे. दुर्लक्षित आणि मागास भागांमध्ये वैद्यकीय शिक्षण संस्था, संशोधन केंद्रे आणि आधुनिक रुग्णसेवा सुविधा उभारणे या योजनेचा गाभा आहे. या उद्दिष्टांसाठी केंद्रीय क्षेत्रातील योजनांवरील तरतूद २०२४–२५ मधील ५,४३७.१९ कोटी रुपयांवरून २०२६–२७ मध्ये थेट ८,४००.७ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे, ही बाब उच्चस्तरीय आरोग्य पायाभूत सुविधांवर सरकारचा वाढता भर स्पष्ट करते.

'राष्ट्रीय एड्स व लैंगिक रोग नियंत्रण' कार्यक्रमांतर्गत एचआयव्ही/एड्स व लैंगिक संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी जनजागृती, तपासणी आणि उपचार व्यवस्था मजबूत करण्यात येते. या प्रतिबंधात्मक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र आकडे न देता केंद्रीय क्षेत्रातील एकूण आरोग्य योजनांच्या तरतुदीत २०२५–२६ च्या तुलनेत २०२६–२७मध्येसुमारे २,३०७ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे (८,४००.७ – ६,०९३.६५). ही वाढ सार्वजनिक आरोग्यातील



प्रतिबंधात्मक उपाययोजनांना अधिक बळ देणारी ठरणार आहे. आरोग्य क्षेत्रातील सर्वात मोठी तरतूद ही 'राष्ट्रीय आरोग्य अभियान' या प्रमुख कार्यक्रमासाठी करण्यात आली आहे. २०२६–२७ मध्ये या अभियानासाठी १,०१,७०९.२१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याच बाबीसाठी २०२४–२५ मध्ये प्रत्यक्ष खर्च ८७,३००.१७ कोटी रुपये होता, तर २०२५–२६ मध्ये सुधारित खर्च ९२,९२५.८६ कोटी रुपये होता. म्हणजेच दोन वर्षांत या अभियानातील तरतूद सुमारे १४,४०९ कोटी रुपयांनी वाढली आहे. या वाढीमुळे देशातील प्राथमिक, दुय्यम आणि तृतीयस्तरीय आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यास मोठी मदत होणार आहे.

'राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत' ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य गरजांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येते. ग्रामीण भागात क्षयरोग, कुष्ठरोग, डासजन्य आजारांचे नियंत्रण, माता व बाल आरोग्य सेवा आणि समुदायाधारित आरोग्य देखरेख या उपक्रमांना प्राधान्य दिले जाते. शहरी भागात शहरी गरीब व दुर्बल घटकांसाठी स्वतंत्र आरोग्य सेवा बळकट केल्या जातात. या सर्व कामांसाठी २०२६–२७ मध्ये १,०१,७०९.२१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असून, हा निधी २०२४–२५ च्या तुलनेत लक्षणीय वाढ दर्शवतो.

याच अभियानांतर्गत आरोग्य मनुष्यबळ आणि वैद्यकीय शिक्षणावरही विशेष भर देण्यात आला आहे. नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करणे, जिल्हा रुग्णालयांचे वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रूपांतर करणे, पदवी आणि पदव्युत्तर जागा वाढविणे तसेच नर्सिंग शिक्षणासाठी नवीन महाविद्यालये सुरू करणे यासाठी राज्यांना निधी दिला जातो. २०२६–२७ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी करण्यात आलेली १,०१,७०९.२१ कोटी रुपयांची तरतूद ही डॉक्टर, नर्सेस आणि प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता कमी करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

आरोग्य विमा संरक्षणाच्या दृष्टीने 'आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' ही योजना अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेअंतर्गत गरीब व वंचित कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत दुय्यम आणि तृतीयस्तरीय रुग्णालयीन उपचारांचे संरक्षण दिले जाते. सुरुवातीला या योजनेत १२ कोटी कुटुंबे समाविष्ट होती; पुढे ३७ लाख आशा व अंगणवाडी सेविका तसेच सुमारे ४.५ कोटी ज्येष्ठ नागरिकांचा समावेश करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या लाभार्थी वर्गासाठी आवश्यक आर्थिक आधार २०२६–२७ मधील राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या १,०१,७०९.२१ कोटी रुपयांच्या तरतुदीतून मिळणार आहे.

आरोग्य क्षेत्रातील तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे 'आरोग्य विकास सेवा'. यामध्ये वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण योजना, सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी आरोग्य कार्यक्रमांचा समावेश होतो. या बाबीसाठी २०२६–२७ मध्ये ४८,०१३.५४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याच घटकासाठी २०२४–२५ मध्ये प्रत्यक्ष खर्च ४२,८५२.९ कोटी रुपये होता, तर २०२५–२६ मध्ये तो ४४,००५.३ कोटी रुपये इतका होता. म्हणजेच दोन वर्षांत या घटकात सुमारे ५,१६० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. या निधीतून कुटुंब कल्याण योजनांअंतर्गत गर्भनिरोधक साधनांचे मोफत वितरण, लोकसंख्या संशोधन केंद्रे, आरोग्य सर्वेक्षण व संशोधन अभ्यास तसेच डॉक्टरांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जाणार आहेत. एकूण निष्कर्ष म्हणून पाहिले, तर यंदाच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रासाठी केंद्रीय योजनांसाठी ८,४००.७ कोटी रुपये, राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी १,०१,७०९.२१ कोटी रुपये आणि आरोग्य विकास सेवांसाठी ४८,०१३.५४ कोटी रुपये अशी भरीव तरतूद करण्यात आली आहे. मागील दोन वर्षांच्या तुलनेत झालेली ही वाढ स्पष्टपणे दाखवते की सरकारचा भर आता केवळ रुग्णालयीन उपचारांपुरता मर्यादित न राहता, आरोग्य पायाभूत सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक संरक्षण देणारी आरोग्य व्यवस्था उभारण्यावर केंद्रित झाला आहे. त्यामुळे केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ हा भारतीय सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम, समावेशक आणि भविष्यातील आरोग्य संकटांसाठी सज्ज करणारा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## श्रीवर्धन पोलिसांचा रूट मार्च

### आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेची ग्वाही

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक 2026 शांततेत व सुरळीत पार पडाव्यात, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या वतीने शहर व पोलीस ठाण्याच्या हद्दीत रूट मार्च (पथसंचलन) काढण्यात आला.

पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप पाटील, प्रदीप राठोड, खरात मॅडम यांच्या नेतृत्वाखाली हा रूट मार्च पार पडला. या पथसंचलनात 35 पोलीस अंमलदार व 58 होमगार्ड सहभागी झाले होते.



यावेळी श्रीवर्धन एसटी स्टँड परिसरात दंगा काबू योजना (Riot Control Drill) राबविण्यात आली. शहरातील मुख्य रस्त्यांसह जसवली, आराठी मेटकर्णी, वाळवटी आदी संवेदनशील भागांमधून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पायी चालत नागरिकांना सुरक्षिततेची ग्वाही दिली. तसेच समाजकंटकांवर वचक निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.शांतता व सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे, या उद्देशाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली. यामध्ये कलम 168 अन्वये 60 जणांना नोटीस बजावण्यात आली असून, कलम 126 नुसार 42 जणांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच 01 व्यक्तीवर कलम 128, 08 व्यक्तींवर कलम 129 अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, 05 व्यक्तींवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून तो शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे व अफवांवर विश्वास ठेवू नये,

असे आवाहन पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी यावेळी केले.

## महाबोधी उपासक संघ नागपूरच्या विद्यमाने शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे १२ व्या वर्धापन दिनानिमित्त २७ व २८ फेब्रुवारीला कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे/भंडारा :** महाबोधी उपासक संघ नागपूरच्या विद्यमाने २७ व २८ फेब्रुवारी २०२६ ला शांतीवन बुद्ध विहार चिचाळ च्या१२ व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. २७ फेब्रुवारीला रात्री १० ते २ वाजेपर्यंत भदंत विनयबोधी महाथेरो व भिक्खू संघ यांचे उपस्थितीत पवित्रण पाठाचे आयोजक करण्यात आले आहे .त्याचप्रमाणे २८ फेब्रुवारीला भदंत विनयबोधी महाथेरो व भिक्खू संघ यांच्या उपस्थितीत धम्मदेशना कार्यक्रमाचे दुपारी २ वाजेपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर ५ वाजेपर्यंत पाहुण्यांचे स्वागत समारंभ व मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या १२ व्या धम्म मेळाव्याचे उद्घाटन प्रकाश सोनवणे मुख्य संपादक ब्ल्यू स्टार्म न्यूज चॅनल पुणे करतील .तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.




बाळकृष्ण सार्वे अध्यक्ष भंडारा जिल्हा पतसंस्था हे राहतील .विशेष अतिथी म्हणून चंद्रशेखर टेंभुर्णे माजी समाज कल्याण सभापती जिल्हा परिषद भंडारा, रोशन जांभुळकर अध्यक्ष संविधान बचाव संघर्ष समिती भंडारा, सदानंद ईलमे मुख्य संयोजक संविधान बचाव संघर्ष समिती भंडारा , शिवशंकर मुंगाटे माजी उसभापती पंचायत समिती पवनी, बि.जी. दामले माजी सरकारी वकील ,राजेश नंदापूरे संस्थापक सरस्वती स्कूल, संजीव भांबोरे राज्य सरचिटणीस प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य, मिलिंद गोंडाने गुरुजी, जयश्री रोडगे माजी सरपंच ,मनोज वैरागडे सामाजिक कार्यकर्ता , सदानंद धारगावे सामाजिक कार्यकर्ता यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील .कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन शांतीवन बौद्ध विहाराचे संचालक जीवनबोधी बौद्ध व शांतीवन बुद्ध विहाराचे अध्यक्ष धम्मरक्षित जीवनबोधि मेश्राम यांनी केलेले आहे.

## हुतात्मा रविंद्र म्हात्रे अमर रहे ! घोषणांनी कन्नमवार दणाणून गेले

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** हुतात्मा रविंद्र म्हात्रे ज्यांनी काश्मिर भारताचा अविभाज्य भाग राहावा म्हणून आपल्या भारतासाठी हुतात्म स्वीकारले त्या थोर विरपुत्र ह्यांच्या ४२ वा स्मृतीदिन गुरुवार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी क्षात्रैक्य परिषद विक्रोळी ह्यांच्या वतीने विक्रोळी कन्नमवार नगरातील विकास हायस्कूल समोरील रविंद्र म्हात्रे मैदानात आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी त्यांना आदरांजली वाहण्यात आली. हुतात्मा रविंद्र म्हात्रे अमर रहे ! या घोषणांनी कन्नमवार दणाणून गेले.रविंद्र म्हात्रे यांच्या भगिनी शीला म्हात्रे




व म्हात्रे कुटुंब आर्वजून उपस्थित होते. शिवसेना उबाठा उपविभाग प्रमुख शेखर जाधव,औदुंबर सराफ,लेखक मोहन अत्रे आदिंनी त्यांना आदरांजली वाहिली.शिवसेना उबाठा विक्रोळी विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले,शाखाप्रमुख अभय राणे,माजी भाजप वॉर्ड अध्यक्ष प्रथमेश राणे, प्रभात मित्र मंडळाचे पदाधिकारी, एकविरा मंडळाचे पदाधिकारी, ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, विकास हायस्कूल विद्यार्थी , नागरिक आदिंची उपस्थिती होती . विनय पाटील ह्यांनी प्रास्ताविक निवेदन केले . विकास हायस्कूल चे बॅन्ड पथक ह्यांनी मानवंदना दिली . युवा सई पाटील हीने हुतात्मा रविंद्र म्हात्रे ह्यांच्या विषयी माहिती दिली. गायक विनायक पेवेकर व त्यांच्या साथीदारांनी हुतात्मा म्हात्रे यांच्याविषयी गीत साजरे केले .या प्रेरणादायी कार्यक्रमामुळे युवा पिढीचे मनोबल वाढविले. आदरांजली कार्यक्रमासाठी क्षात्रैक्य परिषद विक्रोळीचे अध्यक्ष अशोक पाटील,सचिव विनय पाटील , खजिनदार सुजाता म्हात्रे,ट्रस्टी अविनाश घरत, पार्श्वनाथ म्हात्रे,अरविंद सावे , डॉ. राजेश वैद्य , प्रमोद वैद्य यांच्यासह पदाधिकारी संजय राणे , विनायक नाईक, नंदकुमार वर्तक, बाळकृष्ण पाटील ह्यांचे विशेष सहाय्य लाभले .हुतात्मा रविंद्र म्हात्रे यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी कन्नमवार नगरात आल्या होत्या या निमित्ताने आठवणींना उजाळा देण्यात आला.

## हार्बर लाईनवरील AC लोकलमुळे प्रवाशांची गैरसोय; पीक अवर्समध्ये सेवा बंद करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी :** हार्बर रेल्वे मार्गावर सध्या सुरू करण्यात आलेल्या AC लोकल सेवेमुळे सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः कार्यालयीन वेळेत AC लोकलमुळे सामान्य लोकल गाड्यांची संख्या कमी झाल्याने प्रवाशांची गर्दी वाढत असून दैनंदिन प्रवास अधिक त्रासदायक बनला आहे.

आज सकाळी ०९:०९ वाजताची लोकल ट्रेन AC असल्यामुळे ०९:१७ वाजताच्या लोकलसाठी पनवेल रेल्वे स्थानकात प्रचंड गर्दी झाली होती. या गर्दीमुळे प्रवाशांना सुरक्षितपणे चढणे व उतरणे अत्यंत कठीण झाले



होते. काही काळ स्थानकात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असून अपघाताचीही शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

AC लोकलचा फायदा मोजक्या प्रवाशांपुरता मर्यादित असताना, त्याचा फटका मात्र कामगार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना मोठ्या प्रमाणावर बसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक प्रवासी नियमित वेळेत कार्यालये व शाळा-महाविद्यालये गाठू शकत नसल्याने नाराजी व्यक्त करत आहेत.

या पार्श्वभूमीवर पनवेल येथील नागरिक सुभाष शिर्के यांनी रेल्वे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली असून, किमान गर्दीच्या वेळेत (पीक अवर्समध्ये) AC लोकल सेवा तात्पुरती बंद करून अधिक सामान्य लोकल गाड्या सुरू करण्यात याव्यात, अशी विनंती केली आहे.

रेल्वे प्रशासनाने या गंभीर विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.